# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक १८ ऑगस्ट २००९ (का.प.क्र.३० दि.१३.८.०९ ची तहकूब सभा) रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.**

मगंळवार दिं.१८/०८/२००९ रोजी मा.महापौर सौ.विजया किशोर रहाटकर यांचे अध्यक्षतेखाली महापालिकेची सर्वसाधारण सभा महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दु.१२.५५ वा.वंदेमातरम या गिताने सुरू झाली सभेला मा.आयुक्त डॉ.पुरूषोत्तम भापकर,भा.प्र.से.,नगर सचिव श्री.एम.ए.पठाण तसेच संबंधीत अधिकारी व खालील प्रमाणे पालीका सदस्य उपस्थित होते.

०१. स.स.श्री.भाऊसाहेब बाबुराव वाघ
०२. स.स.श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार
०३. स.स.श्री.गजानन रामकिशन बारवाल
०४. स.स.श्री.संजय उत्तमराव जगताप
०५. स.स.श्री.सुरे सीताराम इसराम
०६. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब पुंडलिक
०७. स.स.श्री.गवळी रविकांत काशिनाथ
०८. स.स.श्री.नाहदी नासेर महमंद याहीया
०९. स.स.श्री.पांडे विनायक प्रभाकर
१०. स.स.श्री.दाभाडे मिलिंद यशवंत
११. स.स.श्री.धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
१२. स.स.सौ.विजयाताई बनकर
१३. स.स.श्री.गायकवाड दिलीप नारायण
१४. स.स.सौ.रजनी रमेश जोशी
१५. स.स.श्री.माळवतकर महेश शिवाजीराव
१६. स.स.श्री.अत्तरदे प्रकाश सुका
१७. स.स.श्री.जैस्वाल अनिल जुगललाल
१८. स.स.श्री.सोनवणे कचरू श्रीपती
१९. स.स.श्रीमती मिराताई रामराव शिंदे
२०. स.स.सौ.पाटील दिपाली सुनिल
२१. स.स.श्री.काशिनाथ हरीभाऊ कोकाटे
२२. स.स.श्रीमती खान अजरा जबीन मसुद
२३. स.स.श्रीमती खान मेहरून्निसा खान हमीद
२४. स.स.श्री.मो.जावेद मो.इसाक
२५. स.स.सौ.मिटकर शोभा हरीश्चंद्र
२६. स.स.श्रीमती यास्मीन बेगम अ.कदीर
२७. स.स.श्री.स.खुसरो बुऱ्हानोद्दीन
२८. स.स.श्री.अ.रशिद खान (मामु) हमीद खान
२९. स.स.श्रीमती लता श्रीनिवास दलाल
३०. स.स.श्री.वसंत नरवडे पाटील

३१. स.स.सौ.सिध्द वीणा गजेंद्र
३२. स.स.श्रीमती कुरैशी नजमा बेगम युनूस
३३. स.स.श्री.खान मुजीब मिर आलम खान
३४. स.स.श्री.खान निसार मोहमंद खान
३५. स.स.श्री.खान हाजी शेरखान अ.रहेमान
३६. स.स.सौ.राऊत छाया विलास
३७. स.स.श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर
३८. स.स.श्री.अशोक गोरखनाथ विरकर
३९. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
४०. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
४१. स.स.श्रीमती शेख शमशाद बेगम शेख हफिज
४२. स.स.श्री.संतोष सुधाकरराव जेजुरकर
४३. स.स.श्री.सलिम पटेल समशेर पटेल
४४. स.स.श्री.त्र्यबंक तुपे
४५. स.स.सौ.पोळ सरला सखाराम
४६. स.स.श्री.कटकटे सतिष विश्वनाथ
४७. स.स.श्रीमती खान जहुराबी नासेर
४८. स.स.श्रीमती बोरामणीकर कला सुरेश
४९. स.स.सौ.मंगला प्रकाश गायकवाड
५०. स.स.श्री.रेणुकादास दत्तोपंत वैद्य
५१. स.स.श्रीमती रेखा कैलास काथार
५२. स.स.श्री.गांगे रविंद्र लक्ष्मण
५३. स.स.श्रीमती डॉ.आशा उत्तमराव बिनवडे
५४. स.स.श्री.खेंडके पाटील संतोष
५५. स.स.श्रीमती जयश्री सारंग किवळेकर
५६. स.स.श्री.दामोधर माधवराव शिंदे
५७. स.स.श्री.गांगवे बन्सीलाल तुळशीराम
५८. स.स.श्री.भगवान (बापु) देविदासराव घडमोडे
५९. स.स.श्री.रवि साहेबराव कावडे
६०. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
६१. स.स.सौ.शिंदे पुष्पा बाळु
६२. स.स.सौ.वाघमारे पार्वताबाई विजय
६३. स.स.श्री.विसपुते शशांक दामोधर
६४. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
६५. स.स.सौ.खंदारे वंदना प्रकाश
६६. स.स.सौ.कोंडेकर अंजली दिलीप
६७. स.स.श्री.जोशी संजय रामदास
६८. स.स.श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा
६९. स.स.श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग
७०. स.स.श्री.मोरे कचरू विश्वनाथ
७१. स.स.श्री.संजय पांडूरंग शिरसाट
७२. स.स.श्रीमती मोमीन सफिया फिरदोस अय्युब खान
७३. स.स.श्री.विनोद सोनवणे

**नामनिर्देशित पालिका सदस्य**

०१. स.स.श्री.केनेकर संजय किसनराव
०२. स.स.श्री.तुलशीबागवाले किशोर
०३. स.स.श्री.राजेश (पप्पु) व्यास
०४. स.स.श्री.सुरजितसिंग सबरवाल

**चर्चा :**

श्री.कैलास गायकवाड :शासनाकडील नविन अधिकारी आलेले आहे त्यांचा परीचय व केंव्हा रूजू करून घेतले माहिती दयावी.

मा.आयुक्त :नविन अधिकारी यांनी त्याचा परीचय दयावा.

कर निर्धारक व संकलक : मी अजय राजाराम चारठाणकर दि.६ ऑगस्ट २००९ रोजी करनिर्धारक व संकलक या पदावर रूजू झालो. यापूर्वी माझी १६ वर्षाची सेवा, त्यात धुळे,शिर्डी,फलटन,परळी,नांदेड या ठिकाणी तसेच औरंगाबाद येथील सिडको कार्यालयातही सेवा केलेली आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगा मार्फत १९९३ साली मुख्याधिकारी या संवर्गात रूजू झालो येथे येणेपूर्वी नांदेड महापालिकेत उपाआयुक्त या पदावर कार्यरत होतो.

उपआयुक्त (सिडको) :माझे नाव डॉ.धनजंय दत्तात्रय जावळीकर दि.२७ मार्च १९८९ मध्ये महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागामध्ये मुख्याधिकारी या पदावर कार्यरत झालो. तेंव्हापासून गेवराई,बीड,उदगीर,जळगाव,हिंगोली,लातूर, जालना अशा विविध ठिकाणी सेवा केली औरंगाबाद महापालिकेत दि.५ ऑगस्ट २००९ रोजी उपआयुक्त (सिडको) या पदावर रूजू झालो आहे.

शिक्षणाधिकारी : मी नरगीस शेख औरंगाबाद महापालिकेत शिक्षणाधिकारी म्हणून ११ ऑगस्ट २००९ रोजी रूजू झाले १९८१ ते ८५ जालना डीएड कॉलेज, १९८५ ते २००६ पर्यत औरंगाबाद येथे डीएड कॉलेजला प्राधापिका सन २००६ पासून जिल्हा परीषदमध्ये लासूरगाव येथे मुख्याध्यापीका वर्ग-२ म्हणून कार्यरत सर्वच सेवाही शिक्षण विभागाशी निगडीत आहे. असलेला अनुभवानुसार महापालिकेच्या शाळांना मार्गदर्शन व गुणवत्ता वाढविण्याच्य दृष्टीने काम करेल यासाठी आपल्या सर्वांचे सहकार्याची आवश्यकता आहे.

श्री.कैलास गायकवाड : मागिल बैठकीत प्रशासनाकडे प्रश्न दिला होता त्यांचे उत्तर आलेले आहे प्रश्न क्र. ४६ मध्ये बसैय्येनगर येथील सीटीएस क्र.१२३६९ वरील सीटी डेव्हलपमेंन्ट चार्ज भरणा करून घेण्यात आलेले नाही.असे उत्तर मला मिळालेले आहे.मालमत्ता अधिकारी यांनी दिं.१-१०-२००७ रोजी नगर भुमापन अधिकारी यांना पत्र दिलेले होते त्यांचा खुलासा देण्यात आला नाही.बसैय्येनगर येथील रेखांकनामधील १९३ प्लॉट होते लेऑउट मंजूर झाला त्यानंतर महाराष्ट महसूल अधिनियम ४४ प्रमाणे अकृषी परवानगी भरूण घेणे गरजेचे होते.परंतु सदर संचिकेमध्ये त्याची अदयाप नोंद झालेली नाही अशा आशयाचे उत्तर प्रशासनाने दिले.लेआउट मंजूर करतांना भुखंडधारक यांनी शासनाचा परावर्तीत कर भरणा केला किंवा नाही या संदर्भात प्रश्न विचारला होता परंतु उत्तर समाधानकारक मिळालेले नाही १९३ प्लॉट धारकांचा १९८४ सालचा परावर्तीत कर हा जवळपास २ कोटी असेल परंतु प्रशासनाने परावर्तीत कर तसेच अकृषी परवानगीच्या संदर्भात मा.जिल्हाधिकारी यांचे कडे कोणताही पत्रव्यवहार केला नाही तेंव्हापासून ते आजपर्यतचा कर हा किती तरी कोटीमध्ये

गेला असेलया संदर्भात सन २००७ पासून प्रशासनाला १०-१२ पत्र दिले परंतु समाधानकारक उत्तर दिले जात नाही.परावर्तीत कराच्या बाबतीत प्रशासन व संबधीत भुखंडधारक यांनी मिळून पूर्णपणे शासनाचा महसूल बुडविण्याचा प्रयत्न केला आहे.करीता या प्रकरणी संबधीत अधिका-याची चौकशी व्हावी व संबधीतावर योग्य ती कार्यवाही व्हावी.प्रश्न क्र.४८ मध्ये महापालिकेने १९८४ ला हायस्कूल व खेळाचे मैदान यासाठी ७७०० क्वे. फुट जागा महापालिकेने भुसंपादीत केली होती.संबधीत भुखंडधारक यांना १.२५ लक्ष मोबदला दिला गेला होता.परंतु संबधीत भुखंडधारक यांनी त्या जागेवर त्यांचे नाव लावून धेतले यास कोणते अधिकारी जबाबदारी आहे. संबधीत भुखंडधारक ज्यांनी जागेवर स्वत:चे नाव लावून घेतले यांचेवर फौजदारी गुन्हा दाखल करावा.

श्री.प्रशांत देसरडा : हा विषय माझे वार्डाशी निगडीत आहे नगरपरिषदेपासून आजपर्यत महापालिकेने किती जागा भुसंपादीत केल्या माहिती विचारली होती ती न दिल्यामूळे शाखा अभियंता श्री.एम एम खान यांना निलंबीत केले. मालमत्तांचे एकत्रित रेकॉर्ड व्हावे कुणावर कार्यवाही व्हावी हा हेतू नव्हता स.श्री.कैलास गायकवाड यांनी बसैय्येनगर जागेचा प्रश्न उपस्थित केला १९८५ ला लेआऊट मंजूर ७७०० चौ.मी.जागा भुसंपादीत केली आजपर्यत ती जागा महापालिकेच्या नावावर झाली नाही स.श्री.सतीष कटकटे यांनी एका जागेच्या संदर्भात मुद्या मांडला होता तीही जागा अदयाप महापालिकेच्या नावावर झाली नाही.एमजीएम ते कैलास स्मशानभुमीपर्यत नाला वाहतो तो रेकॉर्डवर नाही लेआऊट धारकांनी महापालिकेची फसवणूक केली नाला न दाखवता लेआऊट मंजूर केला परवानगी मागविली तर नाल्याचा प्रवाह कोठून जाईल असा प्रश्न पडतो. महानगरपालिकेची फसवणूक केली म्हणून गुन्हा दाखल करावा.

श्री.मुजीब खाऩ :त्रिवेणीनगरची ३ ए.२० गुंठे जागा मी स्वत:महापालिकेला शाळा व उदयान विकाससाठी ५ रू. प्रमाणे दिली होती जर ठरल्या प्रमाणे विकास केला नाही तर सदर जमिन परत घेईल असे ॲग्रीमेंन्ट झालेले आहे ती सर्व जागा बाहेरील लोकांना विक्री केली हे काम अधिकारी/कर्मचारी यांनी केले.या संदर्भात स्थायी समितीमध्ये चर्चा झाली नागरीकमध्ये चर्चा आहे त्या जागेची चौकशी करून अहवाल या सभागृहासमोर यायला पाहिजे. २-३ अधिका-यावर या संदर्भात कार्यवाही झाली सर्वसाधारण सभेत या संदर्भात निर्णय झाला परंतु काहीही कार्यवाही झाली नाही.करारनामा झाल्याप्रमाणे ज्या उद्देशासाठी जागा दिली, तो उद्देश पूर्ण झाला नाही तर मी मा.न्यायालयात दाद मागवून ती जमिन परत मिळवील प्रशासनाने नोंद घ्यावी.

श्री.प्रशांत देसरडा :हा विषय गंभीर आहे स्थायी समितीमध्ये चर्चा झाली त्यावेळचे प्रशासक मा.त्रिपाठी साहेब यांनी ४५ हजार क्वे.फुट जागा वर्ग -४ चे कर्मचारी यांना त्रिवेणी हौसींग सोसायटी या नावाने दिली बाजूलाच आणखी ४५ हजार स्क्वे. फुट जागा होती महापालिकेच्या कर्मचाऱ्यांना हक्काचे घर असावे असा प्रशासकाचा हेतू होता. एकूण ९० हजार स्क्वे. फुट जागा विक्री केली आता एकही कर्मचारी तेथे असेल वाटत नाही. संबधीत सोसायटीचे चेअरमन मराठीत दा मू अशी सही करतात त्यांचे ॲग्रीमेन्ट इंग्रजी भाषेत आहे. शंका येते की संबधीत कर्मचाऱ्यांच्या नावाखाली

दुसरे व्यक्ती असतील. ते स्वतः नगररचनामध्ये शिपाई म्हणून काम करतात ४५ हजार स्क्वे. फुट जागा विक्री केली त्या जागेच्या वापर बदल केला तर जागा महापालिकेला परत येवू शकते. सध्या जागा खाली नाही मोठमोठी घरे झाली. जागेचे पीआर कार्ड तपासणी करावे. जागा विक्री केली त्याची चौकशी करण्याचे स्थायी समितीने निर्देश दिले अहवाल येईल.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :२० कोटीची जागा आहे स्थायी समितीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले प्रशासन दुर्लक्ष करीत आहे.महापालिकेच्या मालकीची जागा मनपाचे कर्मचारी खाजगी व्यक्तीना विक्री करतात ३० वर्षाची लिज असतांना ९९ वर्षाची दाखवली जाते हा काय प्रकार आहे.या जागेच्या प्रकरणात जे स्वीकृत दर्शनी दोषी आहे त्यांना निलंबीत करण्याचे आदेश स्थायी समितीने दिले कार्यवाही का झाली नाही खुलासा करावा करारनाम्याचे उल्लंघन झाल्यास त्या जागेवरील झालेल्या विकासासह ती जागा महापालिका परत घेवू शकते करारनामा मध्ये नमूद आहे त्या प्रमाणे जागा परत घेण्याचे आदेशीत करावे.

श्री.संजय जोशी :२०-२५ कोटी पेक्षा जास्त घोटाळा यात असेल कर्मचा-यांना जागा देणेसाठी प्रशासकाने कॉलनी स्थापन केली वर्ग -४ च्या कर्मचा-यांना त्यानंतरही विविध योजनेतून घरे दिली महापालिकेची जागा असतांना ठराविक लोकांचे उखळपांढरे होण्यासाठी ५-५ लक्ष कर्ज दिले. व फ्लॅट घेण्यास भाग पाडले.त्या फ्लॅटची तत्कालीन आयुक्त श्री.गुप्ता साहेब यांनी व्हिजीटपण केली अनेक फ्लॅटमधून पाणी गळती होत होते. हक्काची जागा असतांना विशिष्ट लोकांना हाताशी धरून बिल्डरांकडून फ्लॅट दिले. असलेल्या जागेवर २०X३० चे प्लॉट करून छोटेसे घर करता आले असते.महापालिकेची जागा असतांना या कर्मचाऱ्यांना कर्जाच्या खाईत का टाकले याची पण चौकशी होवून कार्यवाही व्हावी.

श्री.प्रशांत देसरडा :त्यावेळचे आयुक्त यांनी दबाव आणून करण्यास भाग पाडले असे कामगार अधिकारी यांचे म्हणणे आहे.गंभीर विषय आहे

श्री.हिम्मतराव दाभाडे :मुथीयान कॉर्नर येथील महापालिकेच्या जागेवर श्री.माधव घोरपडे यांनी अतिक्रमण केले या प्रकरणात सोनी साहेंबाना चौकशीसाठी नेमले होते अहवाल दिला त्यात संबधीताची जागा रोडमध्ये जात असल्याने त्यास पर्यायी जागा देण्याचे सुचविले होते.परंतु त्यांना जागेचा मोबदला व जागा ही दिली गेली ज्यांनी जागा व पीआर कार्ड संबधीताच्या नावावर करून दिले त्या बाबतीत चौकशी का केली नाही ?

श्री.सतीष कटकटे :ही तहकूब सभा आहे चर्चा करता येते का ?

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:कामकाज चालविण्याची पध्दत असते.विकास कामावर चर्चा न होता जमिनीच्या संदर्भात होत आहे या संदर्भातील प्रश्नावर एक विशेष सभा घ्यावी त्यात निपटारा करावा

श्री.सय्यद खुसरो :मुथीयान कॉर्नर जागेचा मुद्दा अनेक वेळा मांडला योग्य निर्णय घ्यावा.

मा.महापौर प्रश्न क्र.४६,५० वर स.श्री कैलास गायकवाड यांनी प्रश्न विचारलेला होता त्यांना दिलेला खुलासा त्यांना समाधानकारक वाटले नाही यावर प्रशासनाचे मत मांडावे.

सहा.संचालक(न.र) प्रश्न विचारला लेखी खुलासा दिला त्यांना नेमका कशाबध्दल खुलासा हवा आहे त्यांनी नमूद करावे.

| | |
|---|---|
| श्री.कैलास गायकवाड | :दिंनांक १-१०-२००७ रोजी मालमत्ता अधिकारी यांनी नगरभुमापन अधिकारी यांना जो पत्रव्यवहार केला त्या संदर्भात उत्तर विचारले होते दिले नाही. |
| सहा.संचालक(न.र.) | :मालमत्ता अधिकारी याचा खुलासा देतील. |
| श्री.कैलास गायकवाड | :मालमत्ता अधिकारी व सहा.संचालक न.र. दोन्ही अधिकारी एक दुसऱ्याकडे बोट दाखवित आहे खुलासा देत नाही. |
| श्री. प्रशांत देसरडा | :दिं ५-८-०९ रोजी नगररचना विभागाने मालमत्ता विभागास प्रश्नाचा खुलासा मागवला त्याच प्रश्नाबद्दल मालमत्ता अधिकारी यांनी ७ पत्र नगर रचना विभागास देवून माहिती मागविली ७७०० क्वे.फुट जागा महापालिकेने भुसंपादीत केली महापालिकेच्या नावावर नाही असेल तर खुलासा करावा. |
| मा.महापौर | :अधिकाऱ्यांनी एकमेकावर टोलवाटोलवी करणे योग्य नाही प्रश्नाचे उत्तर दयायलाच पाहिजे भुसंपादन केलेली जागा महापालिकेच्या नावावर आहे किंवा नाही मालमत्ता अधिकारी यांनी खुलासा देण्यास हरकत नव्हती. महापालिकेची जागा दुसरे लोक स्वतःच्या नावाने पीआर कार्ड तयार करतात तरी प्रशासन गप्प का आहे. |
| मालमत्ता अधिकारी | : हस्तांतरण करून किंवा विविध पध्दतीने महापालिकेला जागा मिळतात अशा जागा नगररचना विभाग हस्तांतरण करते व त्यानंतर महापालिकेच्या मालकीच्या करणेसाठी पुढील कार्यवाही ही नगरभुमापन विभागाकडे करावी लागते त्यासाठी लागणारी जागेची संपूर्ण कागदपत्र मिळणेसाठी संबधीत विभागास पत्रव्यवहार केला कागदपत्र मिळाली नाही म्हणून जागा मनपाच्या नावावर करणेची कार्यवाही प्रलंबीत आहे. |
| श्री.कैलास गायकवाड | : जागेचे पीआर कार्ड कुणाच्या नावावर आहे मालमत्ता विभागाकडे एक वर्षापासून मागणी करतो उत्तर दिले नाही नगर भुमापन विभागातून पीआर कार्ड मागवून देण्याची तसदी घेतली नाही संबधीत अधिकारी यांनी दिशाभूल केली १९८४ च्या नंतर २०-२२ वर्षात त्या जागेचे पीआर कार्ड महापालिकेच्या नावाने होणेसाठी मालमत्ता अधिकारी यांनी तसदी घेतली नाही.दि.२०.२.२००० मध्ये भुखंडधारकाचे वारस यांनी वारसा हक्काने त्यांचे वडीलांच्या नंतर त्यांचे नाव मिळकतीवर लावून घेतले. |
| मा.महापौर | :सदर जागा नावावर होणेसाठी काय कार्यवाही केली. |
| श्री.सतीष कटकटे | :नुसता पत्रव्यवहार होतो मालमत्ता अधिकारी नगरभुमापन विभागात कधीही जात नाही. |
| श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर | :अधिकाऱ्यामध्ये समन्वय नाही,त्यामूळे कार्यवाही लांबणीवर पडते. |
| श्री.अ.साजेद अ.सत्तार | : अशाचप्रकारे क्रांतीचौक येथील ९ एकर जागा त्वरीत महापालिकेने ८ दिवसात ताब्यात घ्यावी म्हणून मा.उच्च न्यायालयाने आदेश केले ६ महिणे झाले अदयाप जागा ताब्यात घेतली नाही. २००-५००कोटीची जागा असेल.मा.न्यायालयाचे आदेशाची अंमलबजावणी प्रशासन करीत नसेल तर योग्य नाही. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :४ वर्षापासून क्रांतीचौक येथील जागा घेणेसाठी तत्कालीन आयुक्त व इतर अधिकारी यांनी प्रयत्न केले जागेवरील अतिक्रमणे काढली त्यानंतर १ महिणा कुणीही अधिकारी फिरकले नाही नंतर मलामत्ता विभागाचे काही कर्मचारी संबधीतांना ॲप्रोज झाले आम्ही दुर्लक्ष करतो आमचे काय ते सांगा असे ठरले याचा पुरावा आपल्या समोर देवू शकतो आजपर्यत |

यावर कार्यवाही झाली नाही. याच प्रमाणे एसबीएच कॉलनी, गजानननगर जागेच्या संदर्भात नेहमीच प्रश्न मांडत आलो ही जागा महापालिकेच्या मालकीची असून कागदोपत्री महापालिकेचे नाव लावून घेणेची कार्यवाही चालू आहे असे संबधीत विभागाने मला लेखी दिले जागा महापालिकेची आहे नोंद होईल तेंव्हा होईल सर्व माहित असतांना जागेवर लोक पत्र्याचे शेड उभे करतात ते प्रशासकीय विभागास सुचना देवून प्रशासन कार्यवाही करू शकते. माझे मते लाखोचा व्यवहार यात झाला जाणीव पुर्वक प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष होते

श्री.प्रशांत देसरडा : मालमत्ता,नगररचना विभागात आवश्यकतेनुसार उपअभियंता, जेई दिले असे असतांना महापालिकेच्या मालकीच्या जागा नावावर करण्यासाठी विभागास वेळ नाही त्यात काही मिळत नाही म्हणून कार्यवाही झाली नाही असेच म्हणावे लागेल बाहेरील सेवानिवृत्त अधिकारी खास बाब म्हणून यासाठी नेमले त्यांना ४ महिण्यापासून जवळपास ५-७ लक्ष पगारापोटी गेले खर्च झाला असेल माहिती विचारली होती संबधीतास निलंबीत केले परंतु आजपर्यत जागेची यादी माझेपर्यत आली नाही.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :क्रांतीचौकची जागा अदयाप का ताब्यात घेतली नाही मा.न्यायालयाचे आदेशाचे पालन होत नसेल तर संबधीतावर कार्यवाही व्हावी.

श्री.हिम्मतराव दाभाडे : मुथियान कॉर्नर जागेचा मुद्या मांडला खुलासा झाला नाही. प्रश्न मांडतो. नोंद घेतली जात नाही. दिलगिरी व्यक्त करतो.

श्री.रेणुकादास वैद्य : एका जागेचा विषय नाही अनेक जागा महापालिकेच्या ताब्यात नाही. यासाठी मा.आयुक्त किंवा महापौर दालनात संबधीत विभागाचे व महापालिकेचे अधिकारी यांचे समवेत विशेष बैठक आयोजित करून सर्व प्रकरणाचा निपटारा करावा वेळीच भ्रष्टाचार थांबेल.

श्री.कैलास गायकवाड :परावर्तीत कराच्या संदर्भात प्रश्न केला खुलासा मिळाला नाही.

मा.महापौर :महापालिकेच्या जागा प्रशासनाने कुठेही सेफ केलेल्या दिसत नाही. गंभीर तक्रारी सदस्यांनी केल्या त्यात बसैय्येनगर लेआऊट,क्रांतीचौक, गजानननगर,मुथीयान कॉर्नर लेआऊट, एसबीएच कॉलनी अशा अनेक ठिकाणच्या लेआऊटमधील ओपनस्पेस महापालिकेच्या हातातून गेल्या अशी परीस्थिती आहे अनेकवेळा यावर चर्चा ही झाली परंतु कार्यवाही नाही. क्रांतीचौकची जागा अत्यंत महत्वाची व लाखोची मालमत्ता आहे. मा.न्यायालयाने कार्यवाही करण्याचे काय निर्देश निर्णय दिले होते विधी विभागाने खुलासा करावा.तसेच त्यावर मालमत्ता विभगाने काय कार्यवाही तोही खुलासा करावा.

श्री.हिम्मतराव दाभाडे अतिक्रमण होते जागा दुसऱ्यांच्या नावावर होणे. कोर्ट प्रकरण होते हे सर्व अधिकाच्या दुर्लक्षमूळे होते. ज्यांचेकडून चुका झाल्या कार्यवाही करणार की नाही.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : लोकांचा धंदा झालेला दिसतो. गुन्हे दाखल करावे.

श्री.संजय जगताप : तहकूब सभा आहे, विषयपत्रिका घेण्यात यावी.

श्री.सतीष कटकटे :जाफरगेटची जागा महाराष्ट्र शासनाचे नावाने पीआर कार्ड असतांना खाजगी व्यक्तीने नाव त्यावर आता आले २००५ पासून मुद्या मांडतो अदयाप जागा महापालिकेच्या ताब्यात नाही.

मा.महापौर :मालमत्ता हा महत्वाचा विभाग आहे.कुणीही लक्ष देत नाही काम होत नाही. क्रांतीचौक येथील जागे बाबत मा.न्यायालयाने आदेश दिले ८ महिणे झाले याचप्रमाणे. जाफरगेटच्या जागेचा मुद्दा वारंवार उपस्थित होतो या दोन्ही जागा का ताब्यात घेतल्या नाही. खुलासा करण्यास कुणी तयार नाही. कोणीतरी उत्तर द्यावे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय :प्रशासनाला कार्यवाही करण्याचे अधिकार आहे निर्देश करावे त्याप्रमाणे कार्यवाही होईल.

श्री.संतोष खेंडके :सदस्य भुखंडाचे विषय मांडतात त्यावर योग्य निर्णय होत नाही.

श्री.प्रशांत देसरडा : आम्ही कायद्यान्वये प्रश्न विचारलेले आहे. प्रथम उत्तर द्यावे, त्यानंतर चर्चा करावी.

श्री.गजानन बारवाल :यावर खूप चर्चा झाली प्रशासनाचा खुलासा घ्यावा.

मा.महापौर :जे जे मुद्दे स.सदस्यांनी मांडले त्या संदर्भात निवेदन करावे व काय कार्यवाही करणार मा.आयुक्तांनी खुलासा करावा.

मा.आयुक्त :महापालिकेची जागा त्यावर होत असलेले अतिक्रमण व पीआर कार्डला नाव नसणे हा अतिशय गंभीर विषय आहे.अनेक प्रकरणी तक्रारी केलेल्या आहेत स.सदस्यांनीही पत्र देवून अनेक प्रकरणे निदर्शनास आणून दिली महापालिकेकडून संबधीताकडून म्हणावी तशी प्रॉम्प्ट ॲक्शन घेतली गेली नाही.परंतु सभागृहाला असे निवेदन करू इच्छितो की महानगरपालिकेची एक इंचही जागा जावू देणार नाही.कार्यवाही करण्यास वेळ लागला समन्वय नियंत्रणात राहिला नाही.दोन अधिकारी नवीन आलेले आहे अतिरिक्त कार्यभार दुस-याकडे होता त्यामूळे कामे होत नव्हती आल्यापासून बघतो.अर्ज तक्रारी खूप आहे प्रॉब्लेम्स येत होते.जो कामामध्ये समन्वय कमी पडला तो ताबडतोब कव्हर करून तातडीने कार्यवाही केली जाईल दर १५ दिवसाला या संदर्भात बैठक होईल कोणता विभाग मागे पडला कुणामूळे काम होत नाही याची माहिती घेवून कार्यवाही होईल पीआर कार्डवर नाव लावून घेणेसाठी भुमि अभिलेख,जिल्हाधिकारी विभाग आयुक्तांची यंत्रणा यांचे अंतर्गत असलेल्या विभागाचे संबधीत यांचेशी महिण्यातून १-२ वेळेस मा.आयुक्त जिल्हाधिकारी यांना विनंती करून त्यांचे विभागाचे संबधीत जे असतील त्यांचे चर्चा करून महापालिकेल्या जागा जाणार नाही ज्या आहेत त्या नावावर होतील चुकीने गेल्या त्या काढून कशा घेतल्या जातील व जे जबाबदार असतील त्यांचेवर कार्यवाही कशी केली जाईल याचे वेळापत्रक तयार करून एक कालबध्द कार्यक्रम आखला जाईल. यापूढे कोणतीही जागा जाणार नाही याची ग्वाही देतो.

श्री.प्रशांत देसरडा : रेल्वेस्टेशन येथे भुसंपादन कार्यालय आहे ते १५ ऑगस्ट पूर्वी महापालिकेच्या इमारतीमध्ये स्थलांतर होईल असे म्हटले होते अदयाप आले नाही खुलासा करावा.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :क्रंाती चौकच्या जागेचा अजूनही खुलासा झाला नाही.

मा.महापौर :स.नगरसेवकांनी आता येथे स्पेसिफिक जागेच्या संदर्भात खुलासा विचारलेला होता प्रशासनाने केलेल्या खुलाशावर स.सदस्यांचे समाधान झालेले नाही.त्यामूळे जाफरगेट,गजाननगर,एसबीएचकॉलनी,क्रांतीचौक, किंवा त्रिवेणी गृह निर्माण संस्थेची जागा असेलशिवाय इतर असे जागेचे बाबतीत विषय आहे जेथे महापालिकेच्या जागा ज्यात घोटाळे झालेले

आहेत चुकीचे निर्णय महापालिकेच्या कर्मचाऱ्याकडून झाले या सगळयां जागेच्या बाबतीत व स.सदस्यांनी पत्र दिले असतील त्या सर्व जागेच्या बाबतीतल्या संचिकेचा प्रशासनाने अभ्यास करून जागेच्या बाबतीत वेगळी बैठक दि.२० तारखेला सकाळी ११.०० वा. महापौर दालनात घेण्यात येईल व सर्व प्रकरणामध्ये योग्य ते निर्णय घेतले जातील याची सर्वांनी नोंद घ्यावी. भुसंपादन कार्यालयासाठी जागा महापालिकेनेच दिली संपूर्ण खर्च महापालिका करते असे असेल तर ते कार्यालय कुठे ठेवायचे हा अधिकार महापालिकेचा आहे सदर कार्यालय महापालिकेच्या इमारतीमध्ये शिप्ट करण्याचे आश्वासन प्रशासनाने दिले होते त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

श्री.प्रशांत देसरडा : बसैय्येनगर येथील जागा संबधीत व्यक्तीने स्वतःच्या नावावर करून घेतली त्यांचेवर कार्यवाही करणार की नाही.

मा.महापौर :बसैय्येनगर येथील लेआऊटची जागा महापालिकेने भुसंपादीत केली होती ती महापालिकेच्या नावावर करावी पीआर कार्ड महापालिकेच्या नावाने करावे. ज्यांनी यात मन्युपूलेशन केले त्यांचेवर गुन्हे दाखल करावे.ज्या कर्मचाऱ्यांनी कामात कुचराई केली त्यांचेवर प्रशासनाने कार्यवाही करावी.अशाच प्रकारे चौकशी करीत असतांना इतरही जागेच्या बाबतीत झाले असेल त्या बाबतीतही आताच आदेशीत केल्याप्रमाणे अशाच प्रकारे कार्यवाही करण्यात यावी.

**विषय क्र. ५५२ :**

आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहे की, महाराष्ट्र शासन अधिसूचना क्र.वेपुर-१२०९/प्र.क्र.२७/सेवा-९/दि.२२ एप्रिल २००९ अन्वये राज्य शासनाने शासकीय कर्मचाऱ्यांना दिनांक १ जानेवारी २००६ पासून सहावा वेतन आयोग लागू करण्यात आला आहे, त्या अनुषंगाने औरंगाबाद महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचाऱ्यांना राज्य शासनाच्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांप्रमाणे सहावा वेतन आयोग लागू करण्यासाठी पूढील प्रमाणे प्रस्ताव देण्यांत येत आहे.

| | | |
|---|---|---|
| एकूण कर्मचारी/अधिकारी संख्या | | ४३८२ |
| वेतनावरील खर्च रक्कम | रू. | ४,२९,९४,०००/- |
| सेवा निवृत्त कर्मचारी संख्या | | १२४६ |
| निवृत्ती वेतन | रू. | ५०,२७,०००/- |
| **एकूण** | **रू.** | **४,८०,२१,०००/-** |

सहाव्या वेतन आयोगानुसार कर्मचाऱ्यांच्या वेतनात साधारणतः २० ते २५% वाढ झालेली आहे. सदरची वाढ विचारात घेतल्यास महानगरपालिकेस दर महा रू.०१,०८,००,०००/- (सरासरी २२.५०%) चा आर्थिक बोजा पडणार आहे. महानगरपालिकेची सद्याची आर्थिक स्थिती व उत्पन्न विचारात घेता खालीलप्रमाणे प्रस्ताव विचारार्थ सादर.

| | तपशिल | महानगरपालिकेचा प्रस्ताव |
|---|---|---|
| ०१ | सहावा वेतन आयोग लागू करण्याचा | ०१.०१.२००६ |
| ०२ | थकबाकी देण्याचा कालावधी | ०१.०४.२००९ ते ३०.०९.२००९ |
| ०३ | थकबाकीची रक्कम रोखीने देणे | दोन टप्प्यात रोखीने दोन वर्षात |
| ०४ | सेवा निवृत्त धारकांना सहावा वेतन आयोग लागू करणे : | दि.०१.०१.२००६ पूर्वी सेवा निवृत्त झालेल्या निवृत्ती वेतन धारकांना (शासन निर्णय दि.०५.०५.२००९) मूळ निवृत्ती वेतनात ४०% वाढ करणे. |
| ०५ | सेवा निवृत्त वेतन धारकांना थकबाकीची रक्कम देणे | दि.०१.०४.२००९ ते ३०.०९.२००९ दोन हप्त्यात प्रत्येक वर्षी रोखीने |

| | | |
|---|---|---|
| ०६ | दि.०१.०१.२००६ नंतर सेवा निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना | दि.०१.०४.२००९ ते ३०.०९.२००९ दोन हप्त्यात प्रत्येक वर्षी रोखीने, सुधारीत अंशराशीकरण व उपदान थकबाकी रक्कम देय होणार नाही. |

वरील सर्व बाबी विचारात घेता सहावा वेतन आयोग महानगरपालिका अधिकारी/कर्मचाऱ्यांना लागू करणे बाबतचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यास्तव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:१ एप्रिल २००९ पासून थकबाकी देणार असे दिले शासनाने केंव्हा पासून लागू केले ते व प्रस्तावातील तारीख सारखी यावी, मॅच व्हावे. आपण शासनापूर्वी देतो का. कर्मचाऱ्यांना देण्यास आमचा विरोध नाही. दरमहा १.८ कोटी खर्च वाढणार आहे बजेटमध्ये ५ कोटीची तरतूद केली बाकी रक्कमेची तरतूद बजेटमध्ये आहे का? जी दुरूस्ती करायची ती आजच करावी. पुन्हा येवू नये. प्रशासकीय खर्चात कुठे कपात करू शकतो ते करून कर्मचाऱ्यांना वेतन आयोग लागू करण्यास हरकत नाही. शासन केंव्हापासून देते. तेंव्हापासून आपण द्यावे.

श्री.मो.जावेद मो.इसहाक:शहराच्या विकासासाठी निधी नाही हा खर्च कोठून करणार आहे. राज्यातील किती महापालिका/नगरपालिकामध्ये ६ वा वेतन आयोग लागू करण्यात आला. माहितीप्रमाणे ४ महापालिकेत लागू झाले याचा विचार करून योग्य तो निर्णय घ्यावा.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : शासनाच्या निर्णयाप्रमाणे द्यावे.

श्री.संजय जोशी : ६ वा वेतन आयोग स्थायी कर्मचारी यांना लागू होईल या विषयाच्या संदर्भाने अस्थायी कर्मचारी यांचेसाठी काय विचार केला.

श्री.काशिनाथ कोकाटे :यापूर्वी मा.महापौर यांनी कर्मचाऱ्यांना ६ वा वेतन आयोग लागू करण्यात येईल हे जाहीर केले आपल्या शब्दाचा आदर ठेवून यास सर्वांच्या सम्मतीने मान्यता दयावी.

श्री.गजानन बारवाल :यासाठी अनेक वेळा कर्मचारी अधिकारी यांनी आपल्याकडे निवेदन निदर्शने उपोषणासही बसले. तो त्यांचा हक्क आहे शासनाने ०१ जानेवारी ०६ पासून लागू केले आपण जो निर्णय घाईघाईने घेतला पण योग्यवेळी घेतला. आपले अभिनंदन. सर्वाच्या सम्मतीने हा विषय मंजूर करावा.

मा.महापौर : प्रशासनाने शासन निर्णय बघून घ्यावे हा विषय मंजूर करण्यात येतो.

श्री.प्रशांत देसरडा :महापालिकेची आर्थीक परीस्थिती बरोबर नाही काही रक्कम डिपॉजीट केले तर योग्य होईल

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :शासन नियमानुसार कार्यवाही व्हावी.

श्री.संजय जोशी :महापालिकेच्या अस्थापनेवर १०-१५ वर्षापासून अस्थायी कर्मचारी हे दैनिक वेतनावर आहे त्यांचे पगारामध्ये वाढ होण्याबाबतही विचार व्हावा. त्यांना न्याय दयावा.

मा.महापौर : शासन निर्णय बघुन घ्या. हा विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र शासन अधिसूचना क्र.वेपुर-१२०९/प्र.क्र.२७/सेवा-९/दि.२२ एप्रिल २००९ अन्वये राज्य शासनाने शासकीय कर्मचाऱ्यांना दिनांक १ जानेवारी २००६ पासून सहावा वेतन आयोग लागू करण्यात आला असल्यामूळे,औरंगाबाद महापालिकेतील अधिकारी/ कर्मचाऱ्यांना सहावा वेतन आयोग खालीलप्रमाणे लागू करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

एकूण कर्मचारी/अधिकारी संख्या ४३८२

| | | |
|---|---|---|
| वेतनावरील खर्च रक्कम | रू. | ४,२९,९४,०००/- |
| सेवा निवृत्त कर्मचारी संख्या | | १२४६ |
| निवृत्ती वेतन | रू. | ५०,२७,०००/- |
| **एकूण** | **रू.** | **४,८०,२१,०००/-** |

सहाव्या वेतन आयोगानुसार कर्मचाऱ्यांच्या वेतनात साधारणतः २० ते २५% वाढ झालेली आहे. सदरची वाढ विचारात घेतल्यास महानगरपालिकेस दर महा रू.०१,०८,००,०००/- (सरासरी २२.५०%) चा आर्थिक बोजा पडणार आहे. महानगरपालिकेची सद्याची आर्थिक स्थिती व उत्पन्न विचारात घेता प्रस्तावित केल्यानुसार खालीलप्रमाणे मान्यता देण्यांत येत आहे.

| | **तपशिल** | **महानगरपालिकेचा प्रस्ताव** |
|---|---|---|
| ०१ | सहावा वेतन आयोग लागू करण्याचा | ०१.०१.२००६ |
| ०२ | थकबाकी देण्याचा कालावधी | ०१.०४.२००९ ते ३०.०९.२००९ |
| ०३ | थकबाकीची रक्कम रोखीने देणे | दोन टप्प्यात रोखीने दोन वर्षात |
| ०४ | सेवा निवृत्त धारकांना सहावा वेतन आयोग लागू करणे : | दि.०१.०१.२००६ पूर्वी सेवा निवृत्त झालेल्या निवृत्ती वेतन धारकांना (शासन निर्णय दि.०५.०५.२००९) मूळ निवृत्ती वेतनात ४०% वाढ करणे. |
| ०५ | सेवा निवृत्त वेतन धारकांना थकबाकीची रक्कम देणे | दि.०१.०४.२००९ ते ३०.०९.२००९ दोन हप्त्यात प्रत्येक वर्षी रोखीने |
| ०६ | दि.०१.०१.२००६ नंतर सेवा निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना | दि.०१.०४.२००९ ते ३०.०९.२००९ दोन हप्त्यात प्रत्येक वर्षी रोखीने, सुधारीत अंशराशीकरण व उपदान थकबाकी रक्कम देय होणार नाही. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ५५३ :</u>**

औरंगाबाद शहरातील मौजे केसरसिंगपुरा येथील नगर भूमापन क्रमांक १८०९०,१८०९१ व २०१८३ इत्यादी भूखंड मूळ विकास योजना (सन १९७५) नुसार आरक्षण क्र.८९ गार्डन करीता राखीव होते. त्यानुसार भूसंपादन कारवाई सुरू होवून नगर भूमापन क्रमांक १८०९०,१८०९१ व २०१८३ साठी अंतिम निवाडा जाहीर झाला. त्याआधारे आखीव पत्रिकेवर महानगरपालिकेच्या मालकी हक्कात नोंद झालेली आहे. मात्र वरीलपैकी नगर भूमापन क्रमांक २०१८३ मुकूंदवाडी सहकारी गृह निर्माण संस्था यांनी अंतिम निवाडा घोषित झालेल्या जागेचा ताबा देण्यास नकार देत मा.उच्च न्यायालयात धाव घेतली व ताबा घेण्यास मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाने स्थगिती (सन १९९४) दिली.

दिनांक ०४.०२.२००० रोजीच्या मा.सर्वसाधारण सभेमध्ये तत्कालीन स.सदस्य यांनी विषय क्र.२१७/२८ अन्वये मुकूंदवाडी गृह निर्माण संस्था यांचे क्षेत्र आरक्षणातून वगळणेसाठी प्रस्ताव सादर केला व त्यास मा.सर्वसाधारण सभेने मान्यता दिली.

उपरोक्त ठराव मंजूर करणेपूर्वी सदर जागेचा अंतिम निवाडा घोषित झालेला होता. केवळ ताबा घेण्या संदर्भात वाद सुरू आहे. तसेच याच क्षेत्रापैकी नगर भूमापन क्र.२०१८३ काही क्षेत्राचा समावेश असलेले ४००० चौ.मी.क्षेत्राचे आरक्षण बदलून महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनीस ड्रम प्रोजेक्टसाठी फेरबदल करण्यास महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना १९६६ चे ३७ कलम अन्वये मा.सर्वसाधारण सभेने विषय क्र.९२६ दिनांक १८.०७.२००७ अन्वये मान्यता दिलेली आहे. वरील कायद्याचे उपरोक्त कलमाद्वारे पुर्तता होवून शासनाने देखिल त्यास अंतिम मान्यता दिलेली आहे. (शासन अधिसूचना दि.२९ मे २००९.)

वरील वस्तुस्थिती पाहता दिनांक १६.०७.२००९ रोजी झालेल्या मा.सर्वसाधारण सभेमध्ये स.सदस्यांनी दिनांक ०४.०२.२००० रोजीचा ठराव रद्द करणेसाठी विषय क्रमांक द्वारे प्रस्ताव दिला होता. वरील प्रस्तावावरील चर्चेनुसार मा.सर्वसाधारण सभेने प्रशासकीय ठराव ठेवणे बाबतचे

आदेशित केले. त्यानुसार विषय क्र.२१७/२८ दिनांक ०४.०२.२००० रोजीचा ठराव रद्द करणेस्तव प्रस्ताव सादर करण्यांत येत आहे.

**संवाद :**

श्री.गजानन बारवाल :मागच्या वेळेस विषय आला होता सविस्तर नव्हता म्हणून आता पुन्हा ठेवला ही जागा किती आहे एमएसईबी किती रक्कम देणार आहे यात उल्लेख नाही सविस्तर खुलासा व्हावा.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :तातडीने विषय आणला प्रशासनास धन्यवाद.सविस्तर खुलासा व्हावा. व समजून सांगावे.

श्री.मुजीब खान :३-४ सर्वे नंबर दिले ही जागा कुठे किती व मालकी कुणाची, किती क्षेत्र आहे. ३५९ मी जागा डीपी लाईटसाठी देत आहे बाकीचे सर्वे नंबर मध्ये किती रक्कम घेत आहे उल्लेख नाही पूर्वी सदस्यांनी एका सर्वेनंबरचा प्रस्ताव ठेवला नंतर रद्य केले पुन्हा प्रस्ताव येतो ही जागा पजेशन मध्ये नाही कोर्टाकडून आले असे असतांना प्रस्ताव ठेवण्याचा हेतू काय कोणत्या सीटी सर्व्हे मध्ये आरक्षण आहे कोणत्यामध्ये नाही याचाही खुलासा करावा.

श्री.प्रशांत देसरडा :सदस्यांचा अशासकीय प्रस्ताव होता त्याची अमलबजावणी का झाली नाही.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :अगोदर कशासाठी आरक्षण होते ते कुणी ठैवले होते आता प्रस्ताव कशासाठी आला खुलासा व्हावा.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:उदयान साठी आरक्षीत होते त्याचा निवाडा झाला अवार्डही मंजूर झाला जमिनी ताब्यात न घेतल्यामूळे त्यावर स्थगिती आणली ती का काढण्यात आली नाही. १६ वर्षापूर्वीचे आहे आज का आले. मा.उच्च न्यायालयाचे ऑर्डर आहे आरक्षणात बदल करू शकत नाही सभागृहाला जबाबदार धरले जाईल विधी विभागाचा अभिप्राय घ्यावा. रद्य करावे.

सहा.संचालक(न.र.) :आरक्षण वगळयासाठी ठराव नसून सन २००० मध्ये आरक्षण वगळयासाठी प्रस्ताव मंजूर केला होता तो आरक्षण वगळण्याचा ठराव रद्य करण्यासाठी प्रस्ताव ठेवला आहे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :प्रस्ताव तातडीने येण्याचे कारण काय? अशी किती प्रकरणे आहे एकत्रित सर्व सादर करावे.

सहा.संचालक (न.र) :१९७५ च्या विकास योजने प्रमाणे जे ३ सीटीएस नंबर दिले हे उदयानासाठी आरक्षीत होते १९९४ मध्ये त्याचे रितसर भुसंपादनाची कार्यवाही होवून अवार्ड डिक्लेर झाले

श्री.रेणुकादास वैद्य :महापालिकेच्या रेकॉर्डनुसार ही जागा कशासाठी आरक्षीत होती.

सहा.संचालक(न.र.) :उदयान जागा आरक्षीत होती.

श्री.रेणुकादास वैद्य :उदयानसाठी आरक्षीत असलेली जागा ड्रम प्रोजेक्टसाठी कोणत्या नियमाने देवू शकतो.

सहा.संचालक(न.र.) :उदयानसाठी जागा आरक्षीत होती ड्रम प्रोजेक्टसाठी सर्वसाधारण सभेने प्रस्ताव मान्य केल्यानंतर ४००० हजार स्क्वे मी. जागा बाबतचा ठराव मा.न्यायालयात सादर करण्यात आले मायनर मॉडीफिकेशनसाठी थांबविले.

श्री.रेणुकादास वैद्य :एखादया कामासाठी आरक्षीत केलेली जागा परस्पर शासकीय अशासकीय कंपनीला देवू शकतो का कोणत्या नियमाने देवू शकतो यास सर्वसाधारण सभेने ती जागा एमएसईबीला दयावी मान्यता दिली का ती जागा आरक्षीत होती आजही आहे.

| | |
|---|---|
| सहा.संचालक (न.र) | :ड्रम प्रोजेक्टसाठी ही जागा देण्याचा सर्वसाधारण सभेने ठराव पारीत केला आहे.ही जागा केसरसिंगपूरा समाधानकॉलनी मध्ये आहे. |
| श्री.रेणुकादास वैद्य | : एमएसईबी जागा देण्याचा ठराव मंजूर केला आता ती एजन्सी आहे आरक्षण काढलेल्या ठरावचा क्रमांक दयावा. |
| श्री.प्रशांत देसरडा | :जागेचा अंतिम निवाडा झाला होता जागा ताब्यात घेण्याचा वाद आहे.जागाच महापालिकेची नाही तर देता येवू शकते का |
| सहा.संचालक(न.र.) | :ठराव क्र. ९२६ दिं. १८-७-२००७ रोजी ड्रम प्रोजेक्टसाठी जागा देण्याचा ठरावा पारीत झाला होता.(ठराव वाचून दाखवतात.) |
| श्री.मुजीब खान | :आताच आपण नगर भुमापन क्र. १८०९२ म्हटले या ठराव कुठेही तो उल्लेख नाही. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :या जागेच्या मुळ मालकास मोबदला दिला का जागेवर महापालिकेची मालकी आहे का |
| सहा.संचालक(न.र) | :जागेची रक्कम मा.न्यायालयात भरणा केली आहे. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :याचा अर्थ जागेची मालकी मूळ मालक जे आहे त्याचीच आहे त्याचा अधिकार आपल्याला नाही. |
| श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर | :मा. न्यायालयाचा निकाल लागू दयावा त्यानंतर कार्यवाही करावी. |
| श्री.प्रशांत देसरडा | :जागेचा अंतिम निवाडा झाला होता ताबा घेण्या बाबत वाद आहे असे ठरावात म्हटले असे असतांना जागा घेवू शकतो का खुलासा व्हावा. |
| श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर | :मा.न्यायालयात जागेचे पैसे भरणा केले ठराव रद्य करावा व नंतर यावे असे न्यायालयाने म्हटले काय ? |
| सहा.संचालक(न.र) | :१९९४ साली मा. न्यायालयाने जागेच्या पजेशनला स्थगिती दिली ४००० स्क्वे.मी. जागेपैकी १५०० स्क्वे.मी. जागा महापालिकेच्या ताब्यात आहे उर्वरीत जागेला मा. न्यायालयाने स्थगिती दिली २५०० स्क्वे.मी. जागेचे आरक्षण बदल करून ड्रम प्रोजेक्टसाठी ठराव मंजूर केला या जागेचे पजेशन मिळाण्यासाठी प्रकरण दाखल केले आहे जेंव्हा हेरींग झाली तेंव्हा असे म्हटले की महापालिकेने दोन ठराव केले आहे एक ड्रम प्रोजेक्टचा केला व सन २०००आरक्षण वगळण्या बाबत केला दोनही पैकी कोणता ठराव मान्य केला असे विचारणा झाली .ड्रम प्रोजेक्टला देणेसाठीच्या जागेत जी आडकाठी येत होती तो सन २००० चा आरक्षण वगळण्याचा ठराव रद्य करण्याकरीता हा प्रस्ताव ठेवला आहे. |
| श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर | :मा.न्यायालयात जोपर्यत निर्णय लागत नाही ड्रम प्रोजेक्टच्या संदर्भात बोलतो परंतु ती पुर्ण जागा खुली होते.आरक्षणाचा त्याचा काही संबध येत नाही. |
| सहा.संचालक (न.र.) | :२५०० स्क्वे.मी. जागा ड्रम प्रोजेक्टसाठी देणार आहोत त्या बाबतीत मा. न्यायालयाने परवानगी दिल्यानंतर देणार आहोत. |
| सौ.लता दलाल | :मुळ मालकाने मा.न्यायालयात जमा केलेले रक्क्म स्विकारली नसेल व जागेचा ताबा दिला नसेल तर परस्पर व्यवहार महापालिका करू शकते का? |
| सहा.संचालक (न.र) | :ड्रम प्रोजेक्टसाठी आरक्षण टाकलेले होते. |
| सौ.लता दलाल | :ड्रम प्रोजेक्टसाठी आरक्षण टाकले म्हणजे जमिन मालक जागा देईलच असे नाही. |
| श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय | : ४००० स्क्वे.मी जागा ड्रम प्रोजेक्टसाठी देणार उर्वरीत २०१८३ च्या बाबतीत काय निर्णय होणार आहे. |

| | |
|---|---|
| सहा.संचालक (न.र.) | : सदर आरक्षण जशाच्या तसेच राहील. |
| श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय | : आरक्षण तसेच राहणार तर ठराव कशासाठी रद्द करीत आहे. |
| सहा.संचालक (न.र.) | : आरक्षण वगळण्याचा जो सन २००० चा ठराव होता तो रद्द करण्याचा ठराव आहे. |
| श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय | :अगोदर जागेचा ताबा घ्यावा त्यांनतर कार्यवाही करावी. |
| श्री.मुजीब खान | :२००० मध्ये जो ठराव घेतला त्याचा सीटी सर्वे नंबर काय आहे हा प्रस्ताव कुणी ठेवला याचाही उल्लेख नाही. |
| श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय | :जर ड्रम प्रोजेक्टचे आरक्षण बदल केले ती परत करावी दुसरी घ्यावी असे संबधीत मालक मागणी करेल. |
| श्री.अ.साजेद अ.सत्तार | :प्रशासकीय प्रस्ताव नाही प्रशासनाचा खुलासा धेवू नये प्रशासकीय प्रस्ताव यावा |
| श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर | :प्रस्ताव बरोबर आलेला नाही रद्द करावे. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :या जागेच्या संदर्भात प्रकरण न्यायालयात आहे जो निर्णय न्यायालयात लागेल त्याप्रमाणे कार्यवाही करावी. |
| मा.महापौर | :प्रस्ताव कुणी ठेवला याचा उल्लेख यात नाही. हा विषय मा.उच्च न्यायालयात आहे यावर आपण बोलणे योग्य होणार नाही मा.न्यायालयाचे जो निर्णय येईल त्यावेळी हा विषय घेता येईल तुर्त स्थगित ठेवण्यात येते. |
| श्री.वसंत नरवडे पाटील | :जिल्हा परीषद मैदान या जागेसंबंधी ठराव क्र.७९१/११ दिनांक २९.०३.२००७ च्या सर्वसाधारण सभेत विविध क्रिडा स्पर्धासाठी आरक्षीत ठेवण्यास मंजूरी दिली आहे. या संबंधात पूढील वैधानिक कार्यवाही झाली नाही ठरावाची प्रत आपल्याकडे देत आहे,कार्यवाही करण्याचे आदेशीत करावे. |
| मा.महापौर | : दिं.२९-३-२००७ च्या बैठक्ीत हा विषय मंजूर झालेला होता अदयाप कार्यवाही प्रशासनाने केली नाही ती करावी. |

**<u>ठराव :</u>**

प्रस्तुत प्रस्ताव तूर्त स्थगित ठेवण्यास मंजुरी देण्यांत आली.

**<u>विषय क्र. ५५४ :</u>**

आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, औरंगाबाद महानगरपालिकेने शहराच्या वाढीव पाणीपुरवठ्यासाठी सन २००५-०६ मध्ये समांतर जलवाहिनी योजनेचे नियोजन व संकल्पन केले. मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र. ३२२ दिनांक ११.०८.२००६ अन्वये प्राप्त मान्यतेनुसार रुपये ३५९.६७ कोटीचा प्रस्ताव महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची तांत्रिक मान्यता घेऊन केंद्र शासनाच्या UIDSSMT योजनेअंतर्गत अनुदान मिळण्यासाठी सादर केला.राज्यस्तरीय मंजुर समितीच्या दिनांक २८.०९.२००६ व दिनांक ०४.०५.२००७ रोजीच्या अनुक्रमे २ न्या व ४ थ्या बैठकीमध्ये प्रस्तावाचे सविस्तर सादरीकरण करण्यात आले, परंतु प्रस्तावास त्यावेळी मान्यता मिळाली नाही.

मा.संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांनी दिनांक २०.०६.२००९ रोजी पत्र देऊन केंद्रशासन पुरस्कृत UIDSSMT योजने अंतर्गत औरंगाबाद शहर समांतर पाणीपुरवठा योजनेच्या प्रस्तावाला मंजुरी प्राप्त झाल्याचे कळविले आहे. दिनांक ०४.०५.२००७ रोजी संपन्न झालेल्या ४ थ्या राज्यस्तरीय मंजुर समितीमध्ये एकुण रक्कम रुपये ३५९.६७ कोटीच्या प्रस्तावास मान्यता प्राप्त झाल्याचे तसेच केंद्र शासनाने रक्कम रुपये १४३.८६ कोटीचा पहिला हप्ता वितरीत केल्याचे सदर पत्रात नमुद केले आहे. याचसोबत या योजने अंतर्गत करावयाच्या अनिवार्य आणि ऐच्छिक सुधारणांकरीता केंद्र शासनाशी करारनामा करावा असेही पत्रात नमुद आहे.

महानगरपालिकेने समांतर पाणीपुरवठा योजनेचा रुपये ३५९.६७ कोटीचा प्रस्ताव सादर केला तेव्हा सन २००५-०६ ची तत्कालीन दरसुची वापरण्यात आली होती. या प्रस्तावास सन २००५-०६ पासुन आजपर्यंत साधारणतः ३ वर्षाचा कालावधी योजना मंजुर करण्यासाठी लागला आहे.मंजुर योजनेमध्ये जायकवाडी पासुन नक्षत्रवाडी संतुलीत जलकुंभापर्यंत समांतर जलवाहिनी व इतर कामासाठी रक्कम रुपये २५३.३१ कोटी आणि नक्षत्रवाडी संतुलीत जलकुंभ ते शहरापर्यंत गुरुत्ववाहिनी व शहराअंतर्गत वितरण व्यवस्था या कामासाठी रक्कम रुपये १०६.३६ कोटी असे एकुण रुपये ३५९.६७ कोटी अशी तरतुद आहे. योजनेच्या मंजुर किमतीच्या प्रस्तावाची आजच्या दराने (सन २००८-०९ दरसुचीनुसार) एकुण किंमत अंदाजे रक्कम रुपये ६२८.९९ कोटी इतकी येते. मंजुर रकमेपेक्षा रक्कम रुपये २६९.३२ कोटी जास्तीचा खर्च या योजनेसाठी होणार आहे. औरंगाबाद महानगरपालिकेची सद्य आर्थिक स्थिती पाहता, एवढा मोठा वाढीव खर्च पेलने महानगरपालिकेस शक्य होणार नाही.

भारत सरकारच्या वित्त मंत्रालयाने दरम्यानच्या काळात औरंगाबाद महानगरपालिकेच्या विनंतीनुसार India Infrastructure Project Development Fund (IIPDF) योजने अंतर्गत अर्थ सहाय्य देण्यासाठी देशातील नऊ शहरांची निवड केलेली असून, या नऊ शहरांमध्ये औरंगाबाद शहराचा समावेश केलेला आहे. त्यानुसार औरंगाबाद शहर पाणीपुरवठा योजनेमध्ये सुधारणा करुन पाणी पुरवठा सेवेचा दर्जा उंचावण्यासाठी PPP (Public Private Partnership) तत्वावर खाजगी अभिकर्ता नेमुन कामे करण्याबाबत केंद्र शासनाच्या IIPDF योजनेअंतर्गत मान्यता प्राप्त झाली आहे. वित्त मंत्रालय, भारत सरकार यांनी एशियन डेव्हलपमेंट बँक यांच्या सहकार्याने क्रिसील इन्फ्रास्ट्रक्चर ॲडव्हायझरी सर्व्हिसेस, मुंबई या संस्थेची नेमणुक औरंगाबाद शहराच्या पाणी पुरवठ्याचा अभ्यास करुन PPP Operator नेमणेसाठी आवश्यक ती कार्यवाही / अभ्यास करणेसाठी केली आहे. त्यांचेमार्फत पाणी पुरवठा व्यवस्था सुधारण्यासाठी म्हणजेच आस्तीत्वातील वितरण व्यवस्थेचे बळकटीकरण करुन शहरातील पाणीपुरवठ्याचे समानीकरण करणे, अनधिकृत नळजोडण्या, पाणी गळती शोधुन Non Revenue Water (NRW) चा हिशोब लावणे, प्रत्येक नळजोडणीस मिटर लावुन त्यानुसार पाण्याच्या बिलांची वसुली करणे, त्यासाठी बिलांचे संगणकीकरण करणे इ. कामे PPP तत्वावर करण्यासाठी खाजगी अभिकर्ता (PPP Operator) नेमण्याकरीता निविदा प्रक्रीयेसाठी आवश्यक ती कार्यवाही सुरु आहे. डिसेंबर २००९ अखेरपर्यंत जाहीर निविदेद्वारे प्रत्यक्ष खाजगी अभिकर्ता नेमुन तद्नंतर उपरोल्लीखित कामे सुरु करण्याचे प्रयोजन आहे.

UIDSSMT योजनेअंतर्गत मंजुर योजना राबविण्यासाठी आज रोजी रक्कम रुपये २६९.३२ कोटी जास्तीचा खर्च लागणार आहे. त्यासंदर्भाने दिनांक ३०/०७/२००९ रोजी मा. सचिव, नगर विकास, मंत्रालय, मुंबई यांचे दालनात औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेविषयी बैठक संपन्न झाली. या बैठकीस मा.महापौर, मा.सभापती (स्थायी समिती), मा.आयुक्त, शहर अभियंता, कार्यकारी अभियंता (वार्ड ब व क), उप अभियंता (पाणी पुरवठा, जायकवाडी स्थापत्य), क्रिसील इन्फ्रास्ट्रक्चर ॲडवायझारी सर्व्हीसेस, मुंबई यांचे प्रतिनिधी व एशियन डेव्हलपमेंट बँक यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. सदर बैठकीमध्ये औरंगाबाद पाणीपुरवठा योजना, सद्यस्थिती, UIDSSMT योजनेअंतर्गत मंजुर योजना, त्यासाठी लागणारा वाढीव खर्च, केंद्र शासनाच्या IIPDF योजनेअंतर्गत सुधारणा करण्यासाठी करावयाची PPP Operator नेमणुकीची कार्यवाही तसेच मराठवाडा विकास कार्यक्रम २००८ अंतर्गत पाणी पुरवठ्याच्या कामांकरीता प्राप्त रक्कम रुपये ७० कोटी निधीच्या कामासंदर्भाने सविस्तर चर्चा झाली. या चर्चे दरम्यान UIDSSMT योजने अंतर्गत रुपये ३५९.६७ कोटीची मंजुर योजना राबविण्यासाठी लागणाऱ्या वाढीव खर्चापैकी ५०% रक्कम महाराष्ट्र शासन अनुदान रुपाने महानगरपालिकेस उपलब्ध करुन देण्याची शक्यता आहे. तसेच उर्वरीत ५०% रक्कमेचा भार महानगरपालिकेला उचलावा लागणार आहे. तथापी महानगरपालिकेची सद्य आर्थिक परिस्थिती विचारात घेता ह्या रक्कमेचा भार महानगरपालिका तूर्त उचलू शकत नाही. त्यामुळे महाराष्ट्र शासन

किंवा बँकेकडून कर्ज घेता येईल अशी चर्चा झाली. त्यामुळे योजनेचा आर्थिक आकृतीबंध खालीलप्रमाणे राहील.

| | | |
|---|---|---|
| **<u>मंजुर योजना</u>** | | **रुपये ३५९.६७ कोटी** |
| १. | केंद्र शासन अनुदान (८०%) | रुपये २८७.७४ कोटी |
| २. | राज्य शासन अनुदान (१०%) | रुपये ३५.९७ कोटी |
| ३. | महानगरपालिकेचा सहभाग (१०%) | रुपये ३५.९७ कोटी |
| ४. | मराठवाडा विकास कार्यक्रम-२००८ अंतर्गत वितरण व्यवस्थेसाठी मंजुर निधी रुपये ३० कोटी. (प्रस्तावीत / अपेक्षित) | |
| | त्या अंतर्गत • राज्य शासन अनुदान (रुपये ३० कोटीचे ७०%) | रुपये २१.०० कोटी |
| | • महानगरपालिकेचा सहभाग (रुपये ३० कोटीचे ३०%) | रुपये ९.०० कोटी |
| ५. | योजनेसाठी लागणारा वाढीव खर्च **(रुपये २६९.३२ कोटी - रुपये ३० कोटी (प्रस्तावीत / अपेक्षीत) = रुपये २३९.३२ कोटी)** | |
| | • राज्यशासन-अपेक्षित शासन अनुदान(रु.२३९.३२ कोटीचे ५०%) | रुपये ११९.६६ कोटी |
| | • महानगरपालिकेचा सहभाग (रुपये २३९.३२ कोटीचे ५०%) | रुपये ११९.६६ कोटी |
| | | **एकुण रुपये ६२९.०० कोटी** |

- **वरील योजनेतील एकुण अपेक्षित शासन अनुदान** — **रुपये ४६४.३७ कोटी**
  (रु.२८७.७४ + रु. ३५.९७ + रु. २१ + रु. ११९.६६ कोटी)
- **वरील योजनेतील महानगरपालिकेचा एकुण सहभाग** — **रुपये १६४.६३ कोटी**
  (रु.३५.९७ + रु. ९.०० + रु. ११९.६६ कोटी)

याच सोबत प्रत्येक घरासाठी स्वतंत्र जलमापक यंत्र बसविण्यासाठी (आजच्या नळ जोडण्या अंदाजे एक लाख तसेच भविष्यात वाढणाऱ्या अंदाजे ५० हजार अशा मिळून अंदाजे दिड लाख नळ जोडण्यांसाठी) साधारणत: ७५ कोटी खर्च अपेक्षीत आहे. पाणी पुरवठा योजना संपुर्णपणे राबविण्यासाठी अशाप्रकारे महानगरपालिकेस शासकीय अनुदाना व्यतिरीक्त रुपये २३९.६३ कोटी (रुपये १६४.६३ **+** रुपये ७५ कोटी) स्वत: खर्च करावे लागणार आहेत. परंतु महानगरपालिकेची सद्य आर्थिक स्थिती पाहता,एवढा मोठा खर्च करणे औरंगाबाद महानगरपालिकेस शक्य होणार नाही. मराठवाडा विकास कार्यक्रम-२००८ अंतर्गत राज्य शासनाने रुपये १०० कोटीचा निधी जाहीर केला आहे. यामध्ये पाणी पुरवठ्यातील नक्षत्रवाडी संतुलीत जलकुंभापासून शहरापर्यंतची गुरुत्व वाहिनी बदलणे या कामाकरीता रुपये ४० कोटी, पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेमध्ये सुधारणा करण्यासाठी रुपये ३० कोटी व मलनि:सारण केंद्र बांधण्यासाठी रुपये ३० कोटी अशी मान्यता आहे. यापैकी रुपये ४० कोटीचे जलवाहिनी बदलण्याचे काम सुरु करण्यात आले आहे. मलनि:सारण केंद्र बांधण्याचे रुपये ३० कोटीचे काम महानगरपालिकेमार्फत तूर्त स्थगित ठेवण्यात आले आहे. पाणी पुरवठा वितरण व्यवस्था सुधारण्यासाठी रुपये ३० कोटीच्या कामा संदर्भाने कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

त्यामुळे UIDSSMT योजनेअंतर्गत मंजुर निधी रुपये ३५९.६७ कोटी व मराठवाडा विकास कार्यक्रम २००८ अंतर्गत राज्य शासनाने वितरण व्यवस्थेसाठी मंजुर केलेला अपेक्षित निधी रुपये ३० कोटी असा एकुण रुपये ३८९.६७ कोटीचा निधी संपुर्णपणे PPP Model ला जोडुन जायकवाडीपासुन ते शहरापर्यंत व संपुर्ण वितरण व्यवस्थेचे काम एकाच विकासकाकडुन PPP

तत्वावर करुन घेण्याबाबत व योजना स्वयंपुर्ण (ना नफा ना तोटा) होण्यासाठी आवश्यकतेनुसार पाणीपट्टीमध्ये दरवाढ करणे आवश्यक असल्याबाबत दिनांक ३०.०७.२००९ च्या मा.सचिव-२, नगर विकास यांचे दालनात झालेल्या बैठकीत एकत्रित चर्चा होऊन निर्णय झाला. महानगरपालिकेच्या वाट्याची रक्कम PPP तत्वावरील विकासक स्वत: उभारील अशी या मागील कल्पना आहे.

सद्यस्थितीत औरंगाबाद महानगरपालिका खालील प्रमाणे पाणी पट्टीची आकारणी करीत आहे.

| **अ.क्र.** | **नळाचा व्यास** | **घरगुती वापर** | **व्यावसायीक वापर** |
|---|---|---|---|
| १. | १/२" मिटर रहीत | रुपये १८००/- प्रति वर्ष | रुपये ६५००/- प्रति वर्ष |
| २. | ३/४" मिटर रहीत | रुपये २९२५/- प्रति वर्ष | रुपये १२०००/- प्रति वर्ष |
| ३. | १" मिटर रहीत | रुपये ६८२५/- प्रति वर्ष | रुपये २५०००/- प्रति वर्ष |
| ४. | १ १/२" मिटर रहीत | रुपये ३००००/- प्रति वर्ष | रुपये ७००००/- प्रति वर्ष |
| ५. | २" मिटर रहीत | रुपये ५००००/- प्रति वर्ष | रुपये १४००००/- प्रति वर्ष |
| ६. | ३" मिटर रहीत | रुपये ८००००/- प्रति वर्ष | रुपये २०००००/- प्रति वर्ष |
| ७. | ४" मिटर रहीत | रुपये १२००००/- प्रति वर्ष | रुपये ३०००००/- प्रति वर्ष |
| ८. | ६" मिटर रहीत | रुपये २०००००/- प्रति वर्ष | रुपये ४०००००/- प्रति वर्ष |
| ९. | ८" मिटर रहीत | रुपये ३०००००/- प्रति वर्ष | --- |
| १०. | सर्व व्यास मीटर सह | रुपये ८ प्रति हजार लि. | रुपये ३९ प्रति हजार लि. |
| ११. | तात्पुरते बांधकाम मीटरसह | रुपये ३९ प्रति हजार लि. | --- |

समांतर जलवाहिनी योजना कार्यान्वीत होण्यास किमान तीन वर्षांचा कालावधी लागणार आहे. साधारणत: सन २०१२ मध्ये योजना पुर्ण होणे अपेक्षीत आहे. यापूर्वी सन २००३ मध्ये पाणी पट्टीच्या दरात वाढ करण्यात आली होती. त्यामुळे योजना पूर्ण होऊन कार्यान्वीत झाल्यानंतर पहिल्या वर्षी सद्यस्थितीत असलेल्या पाणीपट्टीत (सर्व व्यासाच्या नळांना) सर्वसाधारणपणे २५% वाढ करणे गरजेचे आहे. म्हणजेच साधारणपणे १० वर्षानंतर ही दरवाढ करण्यात येणार आहे. त्याच प्रमाणे प्रत्येक तीन वर्षानंतर पाणी पट्टीमध्ये २५% नैसर्गीक वाढ करणे आवश्यक आहे. ही नैसर्गीक वाढ PPP Operator चा योजना संचलन कालावधी (O & M Period) संपे पर्यंत अंमलात राहील. तद्नंतर पुन्हा नव्याने आढावा घेऊन पाणीपट्टीची रचना करता येईल.

औरंगाबाद महानगरपालिके अंतर्गत संपूर्ण पाणी पुरवठा योजनेसाठी स्वतंत्र मंडळ / कंपनी /SPV (Special Purpose Vehicle) स्थापन केल्यास कर्ज घेणे महानगरपालिकेस सोईचे होईल. या दृष्टीने सुध्दा विचार करणे आवश्यक आहे. करीता मान्यता झाल्यास पाणी पुरवठ्यासाठी स्वतंत्र मंडळ/SPV स्थापन करण्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल.

करीता संपुर्ण पाणीपुरवठा योजना PPP तत्वावर राबविणे व केंद्र शासनाच्या UIDSSMT योजनेअंतर्गत मंजुर निधी रुपये ३५९.६७ कोटी व मराठवाडा विकास कार्यक्रम २००८ अंतर्गत राज्य शासनाने वितरण व्यवस्थेसाठी मंजुर केलेला आणि त्यानुसार अपेक्षित निधी रुपये ३० कोटी असा एकुण रुपये ३८९.६७ कोटीचा निधी सदर कामाकरीता PPP Model ला वर्ग करणे, योजना स्वयंपुर्ण (ना नफा ना तोटा) तत्वावर राबविण्यासाठी उपरोक्त प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार पाणीपट्टीमध्ये २५% दरवाढ करणे आणि संपूर्ण पाणी पुरवठ्यासाठी स्वतंत्र मंडळ/SPV स्थापन करण्यासाठीचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय :जी योजना होती त्यास प्रयत्न करून योजना आणलेली आहे परंतु यात अनेक कामे घुसडले नळाचे रेट जास्त आहे या संदर्भात योजना आणायला पाहिजे त्यानंतर जास्तीत जास्त नळाचे रेट दुप्पट करावयास पाहिजे १० पट वाढवून दिले. जास्त होतात क्र.७,८ मध्ये ३,४ लक्ष प्रति

वर्ष दिले एवढी रक्कम कुणीही देणार नाही अर्धा इंचचे कनेक्शन ६५०० आहेत ३००० हजार प्रति वर्ष ठेवावे

श्री.गजानन बारवाल :या प्रस्तावा संबधीत प्रशासनाकडून खुलासा घ्यावा.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:सिम्पल ठराव करून महापालिकेच्या वाटयाची रक्कम बजेटमध्ये कोठून देणार तरतूद करावी कर्ज घेणार असेल तर तशी तरतूद करावी.पाणीपटटी ३ हजारच्या आत असावी.३ वर्षानंतर योजना अमलात येईल त्यावेळी रेटचा विचार करता येईल.

मा.महापौर :कार्य.अभियंता श्री.पानझडे यांनी या प्रस्तावा विषयी संविस्तर माहिती दयावी.

कार्य.अभियंता-श्री पानझडे : समांतर जलवाहिनी पीपीपी मॉडेलचा सविस्तर प्रस्ताव ठेवला वाचन केले तर ते स्वयंस्पष्ट आहे, असे दिसेल. आताच स.सदस्यांनी ३५९ कोटीची योजना होती सरळ टेंडर काढायचे जे अबाऊ येईल त्यासही मंजूरी दयायची एवढे करण्याची गरज काय? असा प्रश्न उपस्थित केला, परंतु ३० जूलैला मा.सचिव यांचे दालनात या संदर्भात बैठक झाली त्यावेळी चर्चा झाली की, ३५९ कोटीच्या योजनेचे टेंडर काढले ३५९ चे ६०० कोटी झाले. तर वरील रक्कम शासन किंवा इतर कुणीही देणार नाही म्हणून ही संपूर्ण योंजना पीपीपी मॉडेलला जोडली तर वरील रक्कम उपलब्ध होवू शकेल. ही योजना सन २००५-०६ला मंजूर झालेली आहे आता डीएसआरचे दर वाढले आहे. टेंडर काढल्यास ते अबाऊ येणारच आहे कारण जुन्या दराने तयार केले आहे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : जलवाहिनीच्या नावाखाली काही तरी करायचे प्रथम जलवाहीनीचे काम करावे.

श्री.संजय जोशी : वर्षानुवर्षे बोलतो, ही योजना फारोळयापर्यत न घेता शहरापर्यत घ्यावी तरच या योजनेचा फायदा आहे, करायला काय हरकत आहे.

कार्य.अभियंता-श्रीपानझडे : ३५९ कोटीमध्ये जायकवाडी ते फारोळापर्यत पाणी आणायचे ते शुध्द करायचे व एमबीआर मध्ये टाकायचे हा एक पार्ट झाला एमबीआरचे पाणी शहरापर्यत डिस्ट्रीब्युशन करायचे हा दुसरा पार्ट ३५९ कोटीमध्येच दुसऱ्या पार्टसाठी १०६ कोटी ठेवले आहे. योजना सन २००५-०६ च्या डीएसआर नुसार केलेली होती आताच्या डीएसआर नुसार रक्कम वाढणारच आहे ते कुणी दयायचे महापालिकेची परीस्थिती चांगली नाही शासन देणार नाही म्हणून PPP मॉडेलला ॲटच करून मंजूरी घेणेचा प्रस्ताव ठेवला.

श्री.रेणुकादास वैद्य : ३५९ कोटीमध्ये पैठण,फारोळा व शहर आहे. शासनाने ४० कोटी दिले त्यांचे वेगळेच टेंडर का काढले. ती रक्क्म कशातील होती. ३५९ कोटीत ४० कोटी समाविष्ट आहे का.

कार्य.अभियंता(श्री.पानझडे) :४० कोटी निधी हा राज्य शासनाकडून सुजल निर्मल अभियांन हा वेगळा उपक्रम आहे त्यातून मिळाले होते.

श्री.रेणुकादास वैद्य : ४० कोटीमध्ये बरीचशी कामे घेतली ३५९ कोटीच्या योजनेत इतर कामे घेण्याची गरज का पडली.

श्री.संजय जोशी :शासन यानंतर निधी देणार नाही असे यात म्हटले आहे.

कार्य.अभियंता(श्री.पानझडे) : सुजल निर्मल योजना व युआयआयडीएसएमटी योजना म्हणजे सुधारणा हे राबविले नाही तर शासन निधी देणार नाही.

श्री.मुजीब खान :शहराच्या नागरीकासाठी महत्वाचा प्रस्ताव आहे सर्वांना पाणी मिळाले पाहिजे सर्व स्थानिक आमदार,खासदार व स्थानिक, वरीष्ठ पातळीवरील लोकप्रतिनिधी यांनी हा निधी आणण्यासाठी प्रयत्न केले परंतु प्रस्ताव एकत्रित आला फक्त समातंर जलवाहिनी प्रश्न समोर आहे ३ वर्ष काम चालणार त्यानंतर कुणीही कर्ज देणार नाही. इतर कामासाठी स्वतंत्र यायला पाहिजे.

मा.महापौर :३५९ कोटीची योजना होती ४० कोटीचे मध्यतरी टेंडर काढले ते कोणते काम होते ते यात अंतर्भूत आहे का?

श्री.रेणुकादास वैद्य : आम्ही या बाबतीतच बोलतो. ते ऐकावे म्हणुनच बोलत आहोत. अशाचप्रकारे योजना लादतात. आपणांस उत्तरे द्यावे लागेल. वाटोळं होवू नये, म्हणुन विचारतो.

श्री.मुजीब खान :अगोदर समांतर जलवाहिनीचा विचार करावा त्यानंतर इतर कामाचा करावा.सर्वच कामे करण्यामागे असाल तर ३ वर्षात योजना पुर्ण होणार नाही. ३ वर्षानंतर सर्वसाधारण सभा होणार नाही का? आजच का ठेवले पैसे वसूलीचा उल्लेख का आला.

कार्य.अभियंता(श्री.पानझडे) : यात पीपीपी ऑपरेटर खर्च करणार त्यांना त्याचा पैसाही मिळाला पाहिजे. त्यांना आश्वासन देण्याच्या हिशोबाने आतापासून प्रयत्न त्यादृष्टीने प्रस्ताव आणलेला आहे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय :महापालिकेचा हिस्सा ३ वर्षात ११९ कोटी असणार आहे ते कसे कव्हर करणार आहे.

कार्य.अभियंता(श्री.पानझडे) :संपूर्ण योजनेत १६४.६३ कोटी महापालिकेचा सहभाग ठेवावा लागणार राज्य शासन पैसे देण्याची शक्यता आहे. पण मिळाले नाही तर शासन ३५९ कोटीच देणार आहे त्यात १० टक्के राज्य शासनाचे १० टक्के आपले म्हणजे ३५ कोटी महापालिकेला टाकावे लागणार आहे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : आम्ही कमी काम करू,लोन घेवू, चक्कर टाकू नका, खाजगी नांव टाकू नका. आमचा त्यास विरोध आहे.

श्री.अ.रशिद खान :शासन दरबारी बैठका होतात माहित होत नाही पेपरला वाचण्यात येते.कमेटीत कोण असणार त्यांची निवड कशी होणार व त्यांचे अधिकार काय असणार तसेच सर्वसाधारण सभेचे अधिकार काय असेल,त्यात कोण असणार व त्यांचे अधिकार काय? २५ टक्के जी वाढ होणार ती कशा पदधतीने होणार ॲग्रीमेन्ट कसे होणार नमुना मसूदा दयायला पाहिजे तसे यात वरील प्रमाणे एकही दिले नाही.

कार्य.अभियंता(श्री.पानझडे) :ॲग्रीमेंन्ट लगेच होणार नाही आज धोरणात्मक निर्णय घेत आहोत.अधिकार व इतर संबधी यानंतर सविस्तर प्रस्ताव येणार आहे.३५९ कोटीचा मुळ प्रस्ताव १० टक्के महापालिकेचा सहभाग म्हणजे ३५ कोटी २८८ कोटीच प्रत्यक्षात मिळणार आहे ३५ कोटी सुध्दा महापालिकेकडे नाही ही रक्कम व आता टेंडर काढल्यास डीएसआरचे दर वाढले अबाऊ येणारच.

श्री.रेणुकादास वैद्य :३५९ कोटीची योजना २८८ कोटी शासन देणार यापूर्वी ४० कोटी दिले त्यात कोणती कामे केली जे टाकावे लागणार यात ॲड करावे. ४० कोटीचे कामे करतो. मनपाचा वाटा जो टाकावा लागणार आहे ते वाचतील. ४० कोटी Extra (जादा) दिले त्या योजनेसाठीच काम करतात डिस्ट्रीब्युशनचा यात समावेश आहे. ३५९ पैकीच ४० आहे.

३५९-४० होतील की, नाही. सरळ सरळ नागरीकांना वेठीस धरू नका. ४० कोटी मनपाचा वाटा दाखवा. पीपीपी करू नका.

कार्य.अभियंता(श्री.पानझडे) : ४० कोटीत फारोळा ते रेल्वेस्टेशन पर्यत १४०० मीमी ची लाईन, शहरातील मुळ योजनेत डिस्ट्रीब्यूशन नेटवर्कसाठी १०६ कोटी हे लमसम ठेवले होते.प्रत्यक्षात खर्च यापेक्षा जास्त लागणार आहे.शिल्लक राहिल्यास इतर कामासाठी वापरता येतील.४० कोटी हे वेगळया योजनेसाठी आहे ३५ कोटीचा सहभाग याचा संबध नाही. ही रक्कम मायनस न करता शासन वेगळया हेडखाली देतील.

सौ.लता दलाल : ४० कोटी एक्ट्रा दिले की ३५९ कोटीच्या योजनेतील की महापालिका खर्च करते.

कार्य.अभियंता(श्री.पानझडे) : ४० कोटी एक्ट्रा आहे. ३५९ पैकी नाही. सुजल निर्मल अभियांन अंतर्गत शासनाने १०० कोटी जाहीर केले त्यातील ४०-३०-३० कोटी असे उपांग आहे. ४० कोटी हे पाणीपुरवठाच्या कामाचे टेंडर काढले.

श्री.रेणुकादास वैद्य : मी काय बोलतो यांना कळत नाही किंवा मला कळत नाही असे यांना वाटत असेल. ३५९ कोटीची योजना आहे त्यात पाणी डिस्ट्रीब्युशन व इतर सर्व कामे आली शासनाने ४० कोटी वेगळया योजनेतून दिले त्यातून पाणीपुरवठयाचीच कामे होत आहे. २८८ कोटीत समांतर जलवाहिनीची कामे करून घ्यावी महापालिका सहभाग दाखववावा. ३५९-४० ने कमी होईल किंवा नाही. मा.आयुक्त यांनी खुलासा करावा.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय :४० कोटी हे वेगळया योजनेतून दिले आहे या योजनेशी संबध येत नाही पाण्याचे वितरण व्यवस्थेसाठी ते आहे. साधा प्रश्न ३५९ कोटीची योजना महापालिकेचा सहभाग म्हणून तरतूद कशी करणार आहे.समांतर जलवाहिनीची योजना अगोदर चालू करावी बाकीची कामे नंतर करावी.

श्री.प्रशांत देसरडा : समांतर जलवाहीनीसाठी चर्चा चालू आहे. शासन पैसे देणार का.

श्री. काशिनाथ कोकाटे : प्रस्ताव एकंदरीत संशयास्पद आहे. दोन वेगवेगळे प्रस्ताव यायला पाहिजे जायकवाडी ते नक्षत्रवाडी पर्यत समांतर जलवाहिनीसाठी किती खर्च लागणार त्या कामाचे टेंडर काढावे यात शासन किती देणार व महापालिकेला किती टाकावे लागणार त्याप्रमाणे कार्यवाही करावी. समांतर जलवाहिनीचे काम एक वर्षात पुर्ण होणार त्यावेळी इन्टरनल डिस्ट्रीब्युशनचा विचार करावा तो वेगळा प्रस्ताव यावा. इन्टरनल डिस्ट्रीब्यूशनमध्ये अनेक अडचणी येणार असून अगोदर नक्षत्रवाडीपर्यतचे समांतर जलवाहिनीचे काम करून घ्यावे त्यानंतर पूढील इन्टरनल जलवाहिन्या, जलकुंभ, संप बांधण्याचा खर्चाचा प्रस्ताव यावा ४० कोटी हे पाणी पुरवठयावरच खर्च होणार असून ते यातून वजा व्हावेत समांतर जलवाहिनीची योजना २००५-०६ मध्ये बीओटीवर करण्याचे निश्चित केले होते एजन्सी फिक्स करण्यापर्यत आले होते.परंतू योजना का रखडली आजही बीओटीवर काम दिले जाते ४ वर्ष विलंब झाला आणखी ३ वर्ष लागणार ७ वर्ष जनतेला पाण्यापासून वंचीत ठेवले यास जबाबदार कोण याची चौकशी व्हावी. जे मुद्दे मांडले त्याचा खुलासा व्हावा. तसेच वेगवेगळी मंजूरी दयावी.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :४० कोटीतील कामे कोणती याचा घोळ स्थायी समितीमध्ये सुध्दा समजला नाही. पैसे येण्या अगोदरच एजन्सीचे फिक्स करण्यात आली. ४० कोटी कमी केले तर नुकसान आहे जायकवाडी ते औरंगाबाद

शहरापर्यत होणारे कामात खर्च करून त्यातून काही निधी शिल्लक राहणार काय? ४० कोटीच्या रक्कमेत हस्तक्षेप करू नये ही योजना वेगळी आहे समांतर जलवाहिनेचे काम अगोदर करून घ्यावे त्यानंतर पूढील डिस्ट्रीब्युशन चे काम काम करावे पीपीपी इंटरनल डिस्ट्रीब्युशन, समांतर जलवाहीनीचा संबंध आहे का. याचा ही खुलासा करावा.

कार्य.अभियंता(श्री.पानझडे):३५९ कोटी पैकी २५४ कोटी समांतर जलवाहिनीसाठी आहे. हे दर २००५-०६ डीएसआर नुसार असून टेंडर काढल्यास अबाऊ येतील अंदाज १००-१२५ कोटी जास्तीची रक्कम लागणार ते कुणी दयायचे काम झाल्यानंतर उपसा सुरू होईल जे विदयुत बील येईल त्यांची काय व्यवस्था करणार येणा-यां पाण्याचा उपयोग शहरासाठी लगेच झाला पाहिजे हे महत्वाचे त्यासाठी शहरातील सर्व लाईनचा सर्वे करायचा इलिगल कनेक्शन शोधणार सर्वच नळाला मीटर लावणार कॉम्प्युटराईज करणार व तातडीने वसुली सुध्दा करावे लागणार सर्व गोष्टीचा विचार करून काम केले तरच सक्सेस होईल.म्हणून हे दोन्ही कामे एकत्रित ठेवली आहे.

श्री.काशिनाथ कोकाटे :योजना सक्सेस होईल या दृष्टीने काम करावे समांतर जलवाहिनीचे काम करावे त्यानंतर लिकिजेस शोधावे दोन वेगवेगळे प्रस्ताव करावे एकत्रित करणार असेल तर बजेटमधील विकास कामाची तरतूद या कामासाठी वळती करून ही योजना पुर्ण करावी नाही तर २ पार्ट करा. इमानेइतबारे काम व्हावे. गोंधळ निर्माण करू नका. निवडणुका आल्या म्हणून समोर ठेवून काम करू नये.

श्री.प्रशांत देसरडा :समांतर जलवाहिनी व डिस्ट्रीब्युशन व इतर कामे असे दोन्ही प्रस्ताव एकत्रित ठेवले परवा बैठक. जायकवाडी ते नक्षत्रवाडी शासन पैसे देणार नाही. जो डिफरन्स येणार त्यातील ५० टक्के शासन देणार व उर्वरीत ५० टक्क् महापालिकेला टाकावे लागणार ती रक्कम महापालिका देवू शकत नाही म्हणून पीपीपी मॉडेसमार्फत काम करून घेण्याचा प्रस्ताव सादर केला.दिं.१२-२-२००९ रोजी शासनाशी करारनामा सुजल निर्मल अभियान अंतर्गत बजेट सादर करतांना नफा ना तोटा या प्रमाणे पाणीपटटी वसुल करणे बंधनकारक झाले होते.बजेट मध्ये याची कुठेही तरतूद नाही.प्रस्ताव अतिशय चांगला असून बंद पेटीत पडलेला आहे टेंडर ओपन केले असते तर ३५० कोटीत काम झाले असते.समन्वय नसल्यामूळे उशीर झाला त्याचा बोजा जनतेवर आला नसता हे नमुद करावेसे वाटते.४५००रू हा एक नळ कनेक्शन मागे महापालिकेला खर्च आहे १८००रू घेतो पीपीपी मॉडेलमध्ये २५ टक्के रेट वाढवावे लागेल असे म्हटले ते का वाढवावे.जो पीपीपी मॉडेलनुसार काम घेईल ती एजन्सी १६००रू सुध्दा पाणी पुरवठा करू शकेल भिवंडीत काम चालू आहे. कारण अनेक अनधिकृत नळ कनेक्शन आहे ते बंद केले तर एजन्सीला त्याचा फायदा होईल त्यासाठी २५ टक्केची वाढ न करता. या कामा बाबत संपूर्ण टेंडर डाकूमेंट सर्वसाधारण सभेपूढे आणावे. नंतरच निविदा काढावी. आवश्यक दुरूस्त्या करून निर्णय घेता येईल.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : एक दिवसा आड पाणी दिले जाते १८००रू घेतात २५ वाढ करणे योग्य नाही आहे त्याच रेटमध्ये पाणी दयावे

श्री.नासेर नाहदी :यापूर्वीही हा प्रस्ताव आला होता बाजूला ठेवला गेला यामूळे जनतेला त्रास हो्णार आहे गोलमोल प्रस्ताव आलेला आहे.जे ॲग्रीमेन्ट होते ते सभागृहासमोर यायला पाहिजे दुरूस्ती करून सविस्तर प्रस्ताव मागवावा.

श्री.सलीम पटेल :सन २००५-०६ च्या डीएसआर प्रमाणे ही योजना ३५९ कोटीची असून ही योजना ६२८ कोटीची झाली असे कशावरून वाटते कारण डीएसआर चे रेट मागिल वर्षी ॲडप केले त्यावेळी स्टीलचे रेट ५० रू.प्रति कि. होते आता २० आहे येत्या नोंव्हेंबरमध्ये ही योजना परत ४५० कोटीची होईल.त्यासाठी ३५० कोटीचेच टेंडर काढावे टेंडर येवू दयावे पुन्हा सभागृहासमोर ठेवावे योग्य निर्णय घेता येईल.

श्री.गजानन बारवाल : विषय महत्वाचा असून सर्वांना समान,दररोज,मुबलक पाणी पाहिजे. उशीर झाल्यास या योजनेचा खर्च वाढत जाणार आहे नंतर सर्वांनाच त्रास सहन करावा लागेल. राजकीय स्टंट वेगळा यात कुणाचा हेतू या दृष्टीने प्रस्ताव आलेला नाही.कुणालाही झळ पोहचणार नाही भविष्यातील सर्व गोष्टीचा विचार करून कॉम्पीटेशन होवून जास्तीत जास्त महापालिकेचा फायदा कसा होईल बघावे.या योजनेचे संपूर्ण काम होई पर्यंत महापालिकेला हिस्सापोटी मोठी रक्कम खर्च करावी लागणार आहे २५ टक्केची वाढ ही ३ वर्षानंतर पाणी मिळाल्यानंतर होणार आहे वेळोवेळी प्रस्ताव आवश्यकतेनुसार सभागृहासमोर येणे आवश्यक आहे.हा विषय मंजूर केला नाही तर जनता माफ करणार नाही आचारसंहिता केंव्हाही लागू शकते. सदस्यांनी केलेल्या सुचनाची दखल घेवून हा विषय मंजूर करावा.

श्री.सलीम पटेल :६२८ कोटीचे टेंडर न काढता ३२८ कोटीचेच काढावे जे अबाऊ आले तर पुन्हा सभागृहा समोर ठेवावे.योग्य निर्णय घेता येईल नोंव्हेबर २००८ चे रेट प्रमाणे ६२८ कोटी गृहीत धरले आहे आता स्टिलचे रेट कमी झाले. यामूळे सर्व ठेकेदारास माहित पडेल की या टेंडरची अंतिम काम होईल.त्यापेक्षा ५-१० टक्केनी अबाउच येतील.जी ओरीजनल फिगर आहे त्याप्रमाणे टेंडर काढावे.

श्री.रेणुकादास वैद्य :योजना चांगली आहे उशीर झाल्यास नुकसान पाण्याची गरज आहे मंजूर करण्यास कुणाचीही हरकत असण्याचे कारण नाही.पीपीपी मॉडेल बदल्यात दुसरा तोडगा काढता येईल का ते बधावे पीपीपी मॉडेल व दरवाढीला ऑब्जक्शन आहे.डायरेक्ट जनतेला कोणतीही झळ पोहचणार नाही याची दखल घेवून ही योजना मंजूर करण्यास हरकत नाही.

श्री.काशिनाथ कोकाटे :ही योजना व्हावी सर्वाचे मत आहे गेल्या वेळेस प्रमाणेच प्रस्ताव आला त्यावेळी असे काय घडले चर्चा न करता सभा तहकूब करावी लागली ३५९ कोटीचेच टेंडर काढावे स्टीलचे रेट कमी जास्त होतात अबाऊ आले तर जे सक्षम असतील ते मंजूरी देतील नाही झाले तर सभागृहासमोर ठेवतील.योजना करण्यास हरकत नाही जनतेला का वेठीस धरले जाते. पीपीपी मार्फतच का?जनतेचे हित लक्षात घ्यायचे असेल तर दोन्ही कामासाठी दोन टेंडर काढावे अगोदर समांतर जलवाहिनीचे काम करावे खाजगी त्तवावर काम करणारी एजन्सी कमी दरानेही पाणी देवू शकते कारण मेंन्टनस ,सुपरव्हिजन इतर खर्च मर्यादीत ठेवील मशीनरी बदलेल पंपीगसाठी लागणारा लाईटचा खर्च कमी करू शकते.एकत्रित प्रस्ताव मान्य नाही. समांतर जलवाहिनीसाठी

टेंडर काढावे हे काम अगोदर करावे त्यानंतर इतर कामे करावी. ३५९ कोटीची कायवाही करावी. डाक्युमेंट सर्वसाधारण सभेपुढे आणावे नसता मान्य नाही. सभा स्थगित ठेवायची, बंद करायची ही बाब चांगली नाही.

श्रीमती अजरा खान :समातंर जलवाहिनी हा मोठा प्रोजेक्ट आहे तो होण्याची गरज आहे निधी कमी पडतो वसुली करण्याची गरज आहे परंतु ते करीत असतांना वेगळी पध्दत असते यात चुकीची दाखवली आहे.व्यावसायीक ,घरगुती नळ अनेक ठिकाणी अनधिकृत नळ जोडणी आहे त्यांचेकडून वसुली केल्यास ५० टक्के खर्चाची समस्या सुटू शकते २०१२ पर्यत काम चालणार आहे आताच बोजा टाकने योग्य नाही. आहे तेच रेट पाण्याचे ठेवावे. पाणीपटटी वसुली संदर्भात योग्य प्रकारे प्रशासनाने नियोजन करावे.१०० टक्के वसुली होवू शकते.

श्री.विनायक पांडे :यावर खूप वेळ पासून चर्चा चालू आहे माझे वार्डातील अनेक भागात पाणी टंचाई आहे. समांतर जलवाहिनीचे काम झाल्यानंतर पुरेसे पाणी मिळेल असे सांगावे लागते.स्टीलचे रेट कमी जास्त होत राहतील त्याप्रमाणे अंदाजपत्रक होतील प्रस्ताव चांगला आहे नागरीकांवर कुठलाही बोजा न पडता या प्रस्तावास मंजूरी देण्यात हरकत नाही. मंजूर करावे

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय :३५९ कोटीची योजना आहे त्यास मंजुरी द्यायची. ४० कोटीला नाही. ४० कोटी हे वेगळया योजनेसाठी आहे त्यात आणखी ३० कोटी येणार. व यातिल १०६ कोटी वेगळे. शासन अनुदान मिळणार.

श्री.सलिम पटेल : २०० कोटी वाचल्यावर ppp ची गरज पडणार नाही.

श्री.अ.रशिद खान :प्री मिटींगमध्ये मंजूर करण्याचा निर्णय घेतला असेल व मंजूरच करणार असेल तर चर्चा करून अर्थ नाही परंतु यात जनतेचे नुकसान होणार आहे. सर्वाचे मत धेवून निर्णय धेतला तर योग्य होईल.

मा.महापौर :प्रत्येकांला येथे मत मांडण्याचा अधिकार आहे जनतेचा विचार करून मत मांडावे.कोणताही निर्णय ठरवून येथे आलेले नाही.जनतेला पाणी दयायचे आहे चांगले विचार मांडावे त्या प्रमाणेच निर्णय होईल.

श्री.संतोष खेंडके :अनेक गुंठेवारी भागात आजही पाणी नाही पाणी देणे हे महापालिकेचे कर्तव्य आहे.समांतर जलवाहिनीस मंजूरी दयावी.

श्री.काशिनाथ कोकाटे : मागच्या वेळेस सभा का तहकूब केली.

श्री.अ.रशिद खान :सन २००५-०६ चे डीएसआर आहे आता २००९ प्रमाणे २०० कोटीची वाढ होते २०० कोटी न वाढविता ३९५ कोटीचे टेंडर काढावे.

श्री.सलिम पटेल : १००-२०० कोटी वाढवु नका.

श्री.भगवान घडमोडे :ज्या अटी यात टाकलेल्या आहे त्या समजावून सांगाव्या जनतेवर कुठलाही बोजा पडू नये प्रशासनाने सभागृहास कन्व्हेन्स करून हा प्रस्ताव मंजूर करावा.प्रशासन कुठेतरी कमी पडते हा जनतेच्या जिव्हाळयाचा प्रश्न आहे त्यासाठी गळती शोधणे, अनधिकृत असलेल नळ शोधणे वसुली करणे अनेक समस्या समोर आहे ५० टक्के पाणी जनतेला देत नाही. उशीर लागल्यास या योजनेच खर्च वाढेल जनतेला पाणी देवू शकणार नाही. २५ टक्केची वाढ करण्याचा निर्णय घेणेसाठी त्यावेळची परीस्थिती वेगळी असेल आता वाढ करणे योग्य नाही.

श्री.अ.रशिद खान :२०० कोटी कमी करावे.

श्री.संतोष खेंडके :उशीर झाल्यामूळे खर्च वाढलेला आहे. प्रस्तावास मंजूरी दयावी.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय :३५९ कोटीचे टेंडर काढावे बाकीच्या कामासाठी शासनाकडे निधीची मागणी करावी.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :३५९ कोटी जे समांतर जलवाहिनीचे टेंडर काढावे डिस्ट्रीब्युशन व इतर कामाचा नंतर विचार करावा.

श्री.काशिनाथ कोकाटे : ppp करु नये.

मा.महापौर :पीपीपी मॉडेलनुसार केले नाही तर महापालिकेने हिस्सा कोठून दयायचा सुचवावे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय :३५९ कोटीच्या कामास मंजूरी दयावी आपल्या कार्यकाळात होत आहे

मा.महापौर : सचिव सभेच काय ठरले या विषयावर मा.आयुक्त व मलाही निवेदन करायचे आहे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : प्रशासकीय ठराव आहे निवेदनची गरज नाही हे पॉलीसी मॅटर आहे आमचे मत आहे ३५९ कोटीच्या कामास मंजूरी दयावी. या शिवाय वेगळी काय असणार तुम्हाला निवेदन करायचे असेल तर करा.

श्री.अ.रशिद खान यापूर्वी कधीच कोणत्या प्रस्तावावर निवेदन केले नाही आज निवेदन करण्याचे कारण काय ?

मा.महापौर :मुंबई येथे झालेल्या बैठकीत यावर काय चर्चा व ठरले सांगणे माझे काम आहे.

श्री.अ.रशिद खान : जनतेचा विकास करायचा हा दृष्टीकोन समोर ठेवून निर्णय घ्यावा.

याचवेळी अनेक सदस्य मोठमोठयाने बोलतात.

श्री.भगवान घडमोडे :जनतेच्या जिव्हाळयाचा प्रश्न आहे पाणी देण्याची ही नैतिक जबाबदारी आहे मंजूरी दयावी.

श्री.काशिनाथ कोकाटे : बीओटीवर हे काम दयायचे नाही म्हणून ४ वर्षापूर्वी थांबवून ठेवले बीओटीवर देणेचा विषय आहे मंजूर करणार काय ?

मा.महापौर :समांतर जलवाहिनीचे काम व्हावे पाणी यावे सर्वांचीच इच्छा आहे ५६९कोटीचा प्रस्ताव मान्यपण झाला त्यात ८० टक्के केंद्रशासन १० टक्के राज्य शासन व १० टक्के महापालिकेचा वाटा असणार आहे. निधी मिळाला सर्वांना आनंद झाला परंतु या प्रस्तावा संबधी मंत्रालयात अनेक वेळा बैठका झाल्या हा प्रस्ताव कसा व कोणत्या पध्दतीने काम करून पाणी मिळवावे यावर चर्चा झाली आताच अनेकांनी मत व्यक्त केले दोन पार्ट मध्ये या कामाचे टेंडर काढावे मुंबई येथे अर्बन डेव्हलपमेंन्ट विभागाचे सचिव श्री.मनू श्रीवास्वव यांचे दालनामध्ये ही बैठक झाली मी मा.आयुक्त बैठकीला होते ३५९ कोटी हे संपूर्ण योजनेसाठी जायकवाडी ते नक्षत्रवाडी पर्यत पाणी आणणे व डिस्ट्रीब्यूशनचे कामही करावे लागेल असे म्हटले त्यामूळे दोन वेगवेगळी कामे करण्याचा विचार करता येणार नाही असे त्यावेळी चर्चा झाली संपूर्ण योजनेचा खर्च किती येवू शकेल दोन्ही कामे बरोबर करावी नसता हा निधी वाया जाईल याच बरोबर पाण्याला मीटर सुध्दा लावण्यात यावे असे म्हटले ६२८ कोटीची योजना होईल ३६० कोटीच मिळणार उर्वरीत रक्कम महापालिका टाकू शकत नाही त्यावेळी स्पष्ट सांगण्यात आले त्यावर मा.सचिव यांनी एक तर कर्ज उभारणी करावी किंवा पीपीपीच्या माध्यमातून काम करावे अनेक शहरात या माध्यमातून योजना उभ्या आहेत जो काही फरक येतो त्यातील ५० टक्के रक्कम शासन देण्याचा प्रयत्न करेल.असे म्हटले उर्वरीत ५० टक्के रक्कम ही महापालिकेने टाकायची आहे तसेच ३५९

कोटीमध्ये १०टक्के रक्कम एवढी टाकावी लागणार आहे.१६४ कोटी उभे करावे लागणार आहे शासनाने ५० टक्के रक्कम दिली तर ठीक नसता जे वाढीव टेंडरमध्ये रक्कम येईल ती महापालिकेला टाकावी लागेल म्हणून पीपीपी मॉडेल नुसार काम करण्याचे सुचविले व महापालिकेच्या वाटयाची रक्कम ही वेळ येईल तेंव्हा महापालिकेच्या वतीने पीपीपी मॉडेल ऑपरेट करतील.जो फरक येईल तो महापालिकेने पीपीपी मॉडेलला दयावे.योजना पूर्ण झाल्यानंतर जी रक्कम दयावी लागणार ती हप्त्याने ठरवून परतफेड करावी दरवाढ करून वसुल करावे एक वेगळे खाते काढून पीपीपी मॉडेलची परतफेड करू शकता. परंतु आताच एक दिवसा आड पाणी दिले जाते पाणीपटटी वाढवू शकत नाही असे स्पष्ट मी म्हटले त्यावर त्यांनी ज्यावेळी योजना पुर्ण होईल त्यावेळी वाढ करावी असे सुचविले त्यानुसार सर्व माहितीसह प्रस्ताव ठेवलेला आहे.

श्री.गजानन बारवाल :आपण केलेले निवेदन समजलेले आहे हा विषय मंजूर करावा.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय :योजना ३५९ कोटीची आहे.१६४ कोटी टाकण्याचा उल्लेख केला ३५९ कोटीचे अगोदर टेंडर काढून काम करावे २०-३० कोटी अबाऊ आले तर कर्ज काढून देता येईल.

श्री.गजानन बारवाल :दोन वेगळे प्रस्ताव करणे शक्य नाही. मंजूरी दयावी.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय :३५९ कोटीचे टेंडर काढावे वाढीव आल्यास शासनाकडे विनंती करून योजना २००५-०६ ची आहे वाढीव दर आलेले आहे निधीची मागणी करता येईल.

मा.महापौर :प्रशासनाने या प्रस्तावाचे येणाऱ्या काही दिवसात पुर्नविलोकन करावे

श्री.गजानन बारवाल :तत्वतः मान्यता दयावी आचार संहिता लागण्याची शक्यता आहे.

श्री.प्रशांत देसरडा :२५ टक्के पाणीपटटीची वाढ सुचविली ती न करता हा प्रस्ताव मंजूर करावा.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :मुळ जी रक्कम आहे तेवढयाचेच टेंडर काढावे त्यानंतर ज्या अडीअडचणी येतील सभागृहा समोर ठेवावे.

श्री.गजानन बारवाल : आचार संहिता लागण्याची शक्यता आहे दोन पार्ट करणार आता स्थगित करून पुन्हा ठेवणे वेळ कमी असल्यामूळे हे शक्य नाही प्रस्तावास मान्यता दयावी.

श्री.संतोष खेंडके :पाणी पटटीत वाढ न करता प्रस्ताव मंजूर करावा.

मा.महापौर :सर्वाच्या भावना लक्षात घेतल्या सर्वसामान्यावर कोणत्याही प्रकारचा बोजा पडू नये याची दक्षता घेवून हा प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.या योजनेचा खर्च ६२९ कोटी आहे १-२ दिवसात प्रशासनाने या योजनेचे पुर्नविलोकन करून नेमका येत असलेला खर्च काढावा निविदा प्रक्रिया करावी या प्रक्रियेचे सर्व अधिकार या सभागृहाला असतील.प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय :आमचा विरोध नोंदवावा.

मा.महापौर :स.सदस्य श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय यांचा या प्रस्तावास विरोध आहे नोंद करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, केंद्र शासनाच्या UIDSSMT योजनेअंतर्गत औरंगाबाद शहर समांतर पाणीपुरवठा योजनेच्या रुपये ३५९.६७ कोटीच्या प्रस्तावास मान्यता प्राप्त झालेली आहे. हा प्रस्ताव सन २००५-०६ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आला होता. या प्रस्तावाची आजच्या सन

२००८-०९ दरसुचीनुसार एकूण किंमत अंदाजे रुपये ६२८.९९ कोटी इतकी येते. मंजुर रकमेपेक्षा रक्कम रुपये २६९.३२ कोटी जास्तीचा खर्च या योजनेसाठी होणार आहे. उपरोक्त प्रस्तावात सविस्तर नमुद केल्यानुसार वाढीव खर्चापैकी ५०% रक्कम अनुदान म्हणून राज्य शासनाकडून मिळणे अपेक्षित आहे. उर्वरीत ५०% रक्कम औरंगाबाद महानगरपालिकेस उभारावी लागणार आहे. राज्य शासनाकडुन सदर वाढीव खर्चाच्या ५०% रक्कम अनुदान म्हणून न मिळाल्यास वाढीव खर्चाची संपूर्ण १००% रक्कम महानगरपालिकेस उभारावी लागेल. महानगरपालिकेची सद्य आर्थिक स्थिती पाहता हया रकमेचा भार महानगरपालिका उचलु शकत नाही. त्यामुळे केंद्र शासनाच्या IIPDF योजनेअंतर्गत औरंगाबाद पाणीपुरवठा योजनेची सर्व कामे Public Private Partnership (PPP) तत्वावर राबविण्यासाठी खाजगी अभिकर्त्याची (PPP Operator) नेमणुक क्रिसील इन्फ्रास्ट्रक्चर ॲडव्हायझरी सर्व्हीसेस, मुंबई यांचे मार्फत करण्याच्या कार्यवाहीस मान्यता देण्यात येते. औरंगाबाद महानगरपालिकेने समांतर जलवाहिनी योजनेसाठी सर्व साधारण सभा दिनांक २०.०८.२००८ ठराव क्रं. २६६ आणि स्थायी समिती सभा दिनांक ०४.०७.२००९ ठराव क्रं. ३० नुसार युनिटी कन्सल्टंट प्रा.लि. पुणे यांची PMC म्हणून नेमणूक केलेली आहे. त्यानुसार या योजनेसाठी खाजगी अभिकर्ता नेमल्यानंतर योजना कार्यान्वीत होईपर्यंत युनिटी कन्सल्टंट प्रा.लि. पुणे यांनी या कामासाठी महानगरपालिकेच्या वतीने PMC म्हणून काम पहावे. पाणीपुरवठा योजनेची सर्व कामे (Source to tap पर्यंतची) एकाच विकासकाकडून PPP तत्वावर राबवावीत. केंद्र शासनाच्या UIDSSMT योजनेअंतर्गत मंजूर निधी रुपये ३५९.६७ कोटी व मराठवाडा विकास कार्यक्रम-२००८ अंतर्गत राज्य शासनाने वितरण व्यवस्थेसाठी मंजुर केलेला अपेक्षित निधी रुपये ३० कोटी असा एकूण रुपये ३८९.६७ कोटीचा निधी PPP Model ला वर्ग करण्यासाठी ही सर्वसाधारण सभा मान्यता देत आहे.

केंद्र व राज्य शासनाने पाणीपूरवठा योजनेअंतर्गत सेवेचा स्तर उंचावण्यासाठी सुधारणा (Reforms) बंधनकारक केलेल्या आहेत. त्यानुसार पाणीपुरवठा योजनेचे बळकटीकरण करुन शहरातील पाणीपुरवठयाचे समानीकरण करणे, अनाधिकृत नळजोडण्या व पाणी गळत्या शोधून Non Revenue Water चा हिशोब लावणे, प्रत्येक नळजोडणीस मीटर लावून त्यानुसार पाण्याच्या बिलांची वसुली करणे, त्यासाठी बिलांचे संगणकीकरण करणे इ. कामे खाजगी अभिकर्ता (PPP Operator) योजना संचलन कालावधीमध्ये करणार आहे. केंद्र व राज्य शासनाकडून प्राप्त होणाऱ्या अनुदाना व्यतिरीक्त उर्वरीत संपूर्ण रक्कम खाजगी अभिकर्त्याने उभारावी व योजनेची संपूर्ण कामे करुन PPP Model नुसार योजनेचे Operation and maintenance करावे. खाजगी अभिकर्त्याने गुंतवणूक केलेल्या रक्कमेचा योग्य परतावा (Returns)मुद्दल रकमेसह करणेसाठी आणि Operation and maintenance चा खर्च भागविण्यासाठी योजनेच्या संचलन कालावधीमध्ये आवश्यकतेनुसार पाणीपट्टीमध्ये वाढ करणे आवश्यक आहे. योजना कार्यान्वीत झाल्यानंतर पहिल्या वर्षी पाणीपट्टीमध्ये २५% दरवाढ करणे व त्याचप्रमाणे प्रत्येक तीन वर्षानंतर पाणीपट्टीमध्ये २५% नैसर्गिक वाढ करण्यास सर्वसाधारण सभा मान्यता देत आहे.ही दरवाढ करताना शहरातील गरीब जनतेवर आर्थिक बोजा येणार नाही याची खबरदारी घेण्यात यावी. त्यासाठी नळपट्टीत वाढ करणेकरीता वेगळे निकष लावावेत. तसेच आवश्यकता वाटल्यास संपूर्ण पाणी पुरवठयासाठी स्वतंत्र मंडळ /Special Purpose Vehicle (SPV) कंपनी स्थापन करण्यासही ही सर्वसाधारण सभा मान्यता देत आहे. उपरोक्त प्रमाणे सर्व कार्यवाही करण्यासाठी तसेच PPP चे मॉडेल ठरविण्यासाठी मा.आयुक्त महानगरपालिका यांना प्राधिकृत करण्यात येते. त्यांनी निविदा संदर्भाने त्वरीत कार्यवाही करावी. निविदा अंतीम करुन खाजगी अभिकर्ता नेमताना होत असलेल्या प्रक्रियेत सर्वसाधारण सभेच्या वतीने मा.महापौर यांना कोणत्याही टप्प्यावर हस्तक्षेप/ मार्गदर्शन करण्याचे अधिकार राहतील. उपरोक्त कार्यवाहीस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५५ :**

सर्वसाधारण सभा दिनांक १६.०७.२००९ विषय क्र.५४५ च्या निर्णयाप्रमाणे.

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, एन-६ स्मशानभूमी ते सेंट्रल नाका तसेच मदनी चौक ते रोशनगेट पर्यंत ३०० मीमी व्यासाची डी.आय.के.९ जलवाहिनी टाकावयाचे प्रस्तावित आहे.

जलवाहिनी टाकण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे दरसुची सन २००६-०७ नुसार रक्कम रू.१४,७७,७८५/- एवढयाचे अंदाजपत्रक करण्यात आलेले होते. सध्या या कामाचे सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रूपये २६,००,०००/- चे महाराष्ट्र जीवन प्राधीकरण यांचे दरसुची सन २००८-०९ नुसार तयार करण्यात आलेले आहे.

तरी एन-६ स्मशानभूमी ते सेंट्रल नाका तसेच मदनी चौक ते रोशनगेट पर्यंत ३०० मीमी व्यासाची डी.आय.के.९ जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रूपये २६,००,०००/- चे मान्यतेबाबत तथा विचारार्थ सादर.

मा.महापौर : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, एन-६ स्मशानभूमी ते सेंट्रल नाका तसेच मदनी चौक ते रोशनगेट पर्यंत ३०० मीमी व्यासाची डी.आय.के.९ जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी र.रू.२६,००,०००/- चे सुधारीत अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५६ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रासाठी प्रथमतः सन १९७५ ला विकास योजना मंजूर होवून सन १९९१ ला वाढीव हद्दीची विकास योजना मंजूर झाली आहे. सदरील १९७५ ची विकास योजना नंतर सुधारीत करण्यात येवून सन २००१ ला विकास योजना (सुधारीत) मंजूर झाली आहे. त्यानुसार विविध आरक्षण विकासीत करणे त्यासाठी भूसंपादन करणे, तसेच विकास योजना रस्ता याचा समावेश आहे.

भूसंपादन अधिनियम १८९४ अन्वये रितसर भूसंपादन कारवाई विशेष भूसंपादन अधिकारी विशेष घटक औरंगाबाद यांचे मार्फत होते. याबाबत महानगरपालिकेकडून त्यांचेकडे मा.जिल्हाधिकारी मार्फत प्रस्ताव पाठविण्यात येतात व उक्त अधिनियमानुसार पूढील कारवाई होते. विशेष भूसंपादन अधिकारी विशेष घटक औरंगाबादकडे पाठविण्यात आलेल्या विविध प्रकरणाची सद्य स्थिती खालील प्रमाणे.

१. निवाडा जाहीर होवून अद्याप निवाडा रक्कम महानगरपालिकेकडून जमा न करण्यात आल्याने प्रलंबित प्रकरणे - १९
२. अंतिम निवाडा जाहीर करण्यासाठी २/३ रक्कम जमा करण्यासाठी मनपास कळवून मनपाकडून तेवढी रक्कम जमा न करण्यांत आल्याने प्रलंबित प्रकरणे - २३
३. संयुक्त मोजणी करिता प्रलंबित प्रकरणे - ८४

या सर्व प्रलंबित प्रकरणाचा निपटारा होवून भूसंपादन करण्याचे कार्यवाहीस मनपाकडून किमान रक्कम रूपये १०० कोटीची तरतूद होणे अपेक्षित आहे. यामध्ये उक्त अधिनियम/शासन निर्देश/न्यायप्रविष्ठ प्रकरणे,मा.न्यायालयाचे निर्देश यामूळे रक्कमेत वाढ होवू शकते.

उक्त विकास योजना मधील विविध आरक्षणे व रस्ता विकास संबंधाने बाधीत मिळकती त्या क्षेत्राचे भूसंपादन न झाल्याने एम.आर.अँड टी.पी.ॲक्ट १९६६ चे कलम ४९ व १२७ नुसार प्राप्त नोटीसद्वारे कारवाई करणे क्रम प्राप्त ठरते.

तसेच ज्या प्रकरणांची एम.आर.ॲन्ड टी.पी.ॲक्ट १९६६ नुसार मुदत झाली व भूसंपादनाची कारवाई सुरू केली तथापी त्याचा मोबदला भूसंपादन अधिकारी यांचकडे वर्ग केला नाही, असे जमिन मालक मा.न्यायालयात प्रकरण दाखल करीत आहेत व मा.न्यायालयाचे त्यामध्ये तात्काळ पैसे भरणा करणेबाबत आदेश प्राप्त होत आहे.नसता ते आरक्षण व्यपगत होईल असेसूचित करण्यांत येते.

मनपाच्या अर्थसंकल्पामध्ये इतक्या रक्कमेची तरतूद करणे एकूण आर्थिक परिस्थिती पाहता शक्य नाही. त्याकरिता सदर भूसंपादनासाठी लागणारी रक्कम शासनाकडून अनुदान स्वरूपात मागणे करीता प्रस्ताव सादर करण्यांत येत आहे.

**<u>संवाद :</u>**

श्री.विनायक पांडे :१२७ च्या नोटीसच्या अधारे प्रस्ताव ठेवला अनेक जागा आरक्षीत आहे माझे वार्डात २ एकर जागा १९७५ पासून आरक्षीत असून मुळ मालक कचरू कस्तुरे यांनी १० वेळेस निवेदणे दिली काहीच कार्यवाही केली नाही.आरक्षीत ठेवलेल्या सर्व जागा मालकांना बोलवून त्यांना टीडीआर देवून जागा महापालिकेच्या ताब्यात घ्यावे.

श्री.रेणुकादास वैद्य : माझे वार्डापासून ज्योतीनगर कडे जाणा-या रस्त्यावरील अनेक जागा मालकांनी रस्त्यात बाधीत होणा-या जागेचा मोबदला मागितला त्यांनी टीडीआरची मागणी केली त्यांना टीडीआर देतो म्हणून पत्र देवू शकलो नाही. तो रस्ता Jcb लावुन खोदला प्रशासन निष्क्रिय झाले. त्यास T.D.R. देता येईल म्हणुन पत्र दिले तर पुर्ण रस्ता होईल. ताबडतोब मार्गी लावा. १२७ ची नोटीस ज्यांनी ज्यानी दिली त्यांना टीडीआर देण्याची कार्यवाही करावी व ज्या आरक्षीत जागा आहे ते आरक्षण उठवू नये जागा महापालिकेने ताब्यात घ्याव्यात. T.D.R.,F.S.I. देवून मिटवावे.

मा.महापौर : स.सदस्य श्री.वैद्य यांचे सूचनेप्रमाणे खरोखरच २०० मी. रस्ता राहीलेला आहे. या रस्त्याच्या संबंधीत, प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी तेथील नागरीकांना तातडीने टीडीआर देण्याची कार्यवाही व्हावी. व प्रश्न सोडवावा.

श्री.प्रशांत देसरडा :अनेक जागेचे भुसंपादन केले मोबदला दिला नाही १९९२ ची काही प्रकरणे आहे. आपण महाराष्ट्र महापौर परिषदेच्या अध्यक्षा आहात सर्व महापौर मिळून शासनाकडे कम्प्लसरी जागेच्या मोबदल्या टीडीआर घेण्याचा कायदा करण्याची सक्ती करावी. आता ऐच्छिक आहे. महापालिकेने किंवा आर्कीटेक्ट असोशिएशनने टीडीआरचे स्वरूप कसे असावे निवेदन शासनाकडे दिले नाही म्हणून शासनाने व नगररचना विभागाने मिळून जे टीडीआर मंजूर करून आणले ते चुकीचे आहे कारण शहरात अनेक रस्ते आहे तेथे टीडीआर लागू होत नाही. अमरप्रीत हॉटेल ते दर्गारोड,गजानन महाराजरोड ई.ज्या चूका झाल्या, दुरूस्ती करून सर्वसाधारण सभेपूढे आणावे. व मंजूर करण्यांत यावे.

श्री.अ.रशिद खान :टीडीआर कम्प्लसरी करणे आवश्यक नाही गरीब लोक राहतात त्यांची एकच घरे आहे. टीडीआर घेत नाही. नागपूर,मुंबई,पुणे येथे चालतो औरंगाबाद मध्ये हे कम्प्लसरी नाही.

श्री.प्रशांत देसरडा :टीडीआर ची मिळकत विकता आली पाहिजे असे करावे.

श्री.अ.रशिद खान मामू :टीडीआरची मिळकत कुणीही विकत घेत नाही. काही भाग सोडून टीडीआर देता येईल.

श्री.गजानन बारवाल अनेक प्रकरणात कोर्ट मॅटर चालू आहे काय अडचणी येत आहे प्रशासनाचे मत जाणून घ्यावे.

प्र.सहा.संचालक(न.र.) :विकास योजना मंजूर झाल्यानंतर ज्या मालकाची जागा आरक्षणामध्ये ठेवलेली असते तो एमआरअ‍ॅन्ड डीपी ॲक्ट १९६६ चे कलम ४९ ची नोटीस शासनास बजावेल शासनाकडून कन्फर्म झाल्यानंतर एक वर्षाच्या आत भुसंपादनाची महानगरपालिकेला कार्यवाही करावी लागते. तसेच

विकास योजनेला १० वर्ष पूर्ण झाल्यानंतर जागा भुसंपादीत केली नाही तर ती व्यक्ती अशा वेळेला १२७ ची नोटीस महापालिकेला बजावू शकतो ६ महिन्याच्या मुदतीत जागा भुसंपादीत केली नाही तर व्यपगत होते. आता १०० कोटीचे भुसंपादनाचे प्रस्ताव पाठविले आहे ज्याची नोटीस कन्फर्म झाली असे मिळकतधारक मा.न्यायालयात अप्रोच होत आहे. व मा.न्यायालय जागेचा मोबदला काही दिवसाची मुदत देवून डिपॉजीट करण्याचे आदेशीत करीत आहे नसता जागा डिलीट करतो मा.न्यायालय असे आदेश करीत आहे की भुसंपादनाची कार्यवाही होत असतांना २/३ रक्कम भरणा केली नाही तर ते भुसंपादन सुरू करण्यात आले असे समजणार नाही. अशा नोटीस प्राप्त होत आहे व मा.न्यायालयाच्या निर्णयाचा संबधीत मिळकत धारक लाभ घेवू शकतो १०० कोटी भरणा करायचे आहे महापालिकेची आर्थीक स्थिती तशी नाही म्हणून किमान शासनाकडे तरी मागणी करावी व योग्य ती चर्चा व्हावी या दृष्टीने प्रस्ताव सादर केला.

श्री.गजानन बारवाल :टीडीआर मूळे पूणे मध्ये काय प्रकार झाले नगरसेवकांना किती त्रास झाला हे सर्वांना माहित आहे.टीडीआरची प्रकरणे सभागृहासमोर येत नाही म्हणून अनेक प्रकरणस वाचा फुटते शासनाने भुसंपादनासाठी यापूर्वी कधीही रक्कम दिली नाही आता देणार आहे का? शासन कदापीही या गोष्टी मान्य करणार नाही यासाठी महापालिकेलाच एक प्रकारे धोरण ठरवावे लागेल.यास मंजूर करण्यास हरकत नाही परंतु काही प्रकरणात आठ दिवसाच्या आत रक्कम भरणा करावी असे निर्देश मा. न्यायालयाचे आहे त्या बाबतीत काय निर्णय घेणार आहोत.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर मा.न्यायालयात सांगावे शासनाकडे भुसंपादनासाठी रक्कम मागणी केली आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :जे टीडीआर मागतात त्यांना त्वरीत देण्यात यावे.

श्री.प्रशांत देसरडा :श्री.वडजे बिल्डरंनी टीडीआर ची मागणी केली दीड वर्षापासून ते चकरा मारतात दिला नाही.

मा.महापौर :ज्यांनी टीडीआरची मागणी केली त्यांना त्वरीत टीडीआर देण्यात यावे.

सहा.संचालक (न.र.) :श्री.वडजे यांचे प्रकरणात पूर्वी मा.आयुक्तांनी असे आदेश केले होते की ही कार्यवाही भुसंपादन अधिकाऱ्याकडून करावी परंतु ती त्या विभागाकडून होत नाही मा.आयुक्तांना अधिकार आहे आता संचिका मा.आयुक्तांच्या मंजूरीसाठी आहे

श्री.गजानन बारवाल :२० वर्षापासून माझे वार्डात शाळेसाठी आरक्षण आहे काही जागा दोन लोकांचा वाद असल्यामूळे त्या जागेवर मोठा कचरा साचला आहे.२० फुट खोल कचरा साचलेला आहे.महापालिकेने उचलून घ्यावा येणारा खर्च कोर्टात सादर करून वसूल करावा.

मा.महापौर : हा विषय मंजूर करण्यांत येतो. आरक्षणातून जागा वगळणार नाही, याची प्रशासनाने काळजी घ्यावी. ज्यांनी टीडीआरची मागणी केली, त्यांना ताबडतोब देण्यात यावे. त्याची माहिती या सभागृहासमोर ठेवावी. या सोबतच शासनाकडे असाही प्रस्ताव पाठविता येवू शकेल की, आपल्या शहराचा नव्हे हा सर्व शहराचा प्रश्न आहे. सर्व ठिकाणचे भूसंपादनाची रक्कम महापालिका देवू शकत नाही. टीडीआर कंपलसरी करण्याचा कायदा केलातर लोकांचे संपूर्ण इंट्रेस सेफ राहतील.आताच

सदस्यांनी म्हटल्याप्रमाणे एखाद्या व्यक्तीला टीडीआर लागत नसेल पैशाची गरज असेल तर ती टीडीआरच्या माध्यमातून पूर्ण होत नाही अशावेळी त्या व्यक्तीला त्यांचे हक्काला बाधा पोहचेल म्हणून टीडीआर संबंधीचे सुध्दा नियमात बदल झाला पाहीजे. त्या नियमात बदल व्हावा आणि टीडीआर कंपलसरी होण्याचा फायदा व्हावा. अशाप्रकारचा एक प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठवावा. जे टीडीआरमधील नियम आहे, त्यात पण दुरूस्ती करून घ्यावी. टीडीआर घेतल्यानंतर ती जागा संबंधीतास विक्री करता आली पाहीजे, अशी नियमात दुरूस्ती व्हावी.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहर (सुधारीत) मंजूर विकास योजनेनुसार विविध आरक्षण विकसीत करणे त्यासाठी भूसंपादन करणे, तसेच विकास योजना रस्त्याचा यात समावेश असल्यामूळे,आणि भूसंपादन अधिनियम १८९४ अन्वये रितसर भूसंपादन कारवाई विशेष भूसंपादन अधिकारी विशेष घटक औरंगाबाद यांचे मार्फत होते. याबाबत महानगरपालिकेकडून त्यांचेकडे मा.जिल्हाधिकारी मार्फत प्रस्ताव पाठविण्यात येतात व उक्त अधिनियमानुसार पूढील कारवाई होते. विशेष भूसंपादन अधिकारी विशेष घटक औरंगाबादकडे पाठविण्यात आलेल्या विविध प्रकरणाची सद्य स्थिती खालील प्रमाणे.

१. निवाडा जाहीर होवून अद्याप निवाडा रक्कम महानगरपालिकेकडून जमा न करण्यात आल्याने प्रलंबित प्रकरणे - १९
२. अंतिम निवाडा जाहीर करण्यासाठी २/३ रक्कम जमा करण्यासाठी मनपास कळवून मनपाकडून तेवढी रक्कम जमा न करण्यांत आल्याने प्रलंबित प्रकरणे - २३
३. संयुक्त मोजणी करिता प्रलंबित प्रकरणे - ८४

या सर्व प्रलंबित प्रकरणाचा निपटारा होवून भूसंपादन करण्याचे कार्यवाहीस मनपाकडून किमान रक्कम रूपये १०० कोटीची तरतूद होणे अपेक्षित असल्यामूळे, उक्त विकास योजना मधील विविध आरक्षणे व रस्ता विकास संबंधाने बाधीत मिळकती त्या क्षेत्राचे भूसंपादन न झाल्याने एम.आर.अँड टी.पी.ॲक्ट १९६६ चे कलम ४९ व १२७ नुसार प्राप्त नोटीसद्वारे कारवाई करणे क्रम प्राप्त ठरते. तसेच ज्या प्रकरणांची एम.आर.ॲन्ड टी.पी.ॲक्ट १९६६ नुसार मुदत झाली व भूसंपादनाची कारवाई सुरू केली तथापी त्याचा मोबदला भूसंपादन अधिकारी यांचकडे वर्ग केला नाही, असे जमिन मालक मा.न्यायालयात प्रकरण दाखल करीत आहेत व मा.न्यायालयाचे त्यामध्ये तात्काळ पैसे भरणा करणे बाबत आदेश प्राप्त होत आहे. नसता ते आरक्षण व्यपगत होईल असे सूचित करण्यांत येत असल्यामूळे, मनपाच्या अर्थसंकल्पामध्ये इतक्या रक्कमेची तरतूद करणे एकूण आर्थिक परिस्थिती पाहता शक्य नसल्यामूळे, त्याकरिता सदर भूसंपादनासाठी लागणारी रू.१०० कोटी रक्कम शासनाकडून अनुदान स्वरूपात मागणेस मान्यता देण्यांत येते.

तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार टीडीआर संबंधीचे नियमात बदल झाला व्हावा,आणि टीडीआर कंपलसरी होण्याचा फायदा व्हावा व जे टीडीआरमधील नियम आहे, त्यात दुरूस्ती करून घेणे, टीडीआर घेतल्यानंतर ती जागा संबंधीतास विक्री करता आली पाहीजे, अशी नियमात दुरूस्ती व्हावी. अशाप्रकारचा एक प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठविणेसही सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

## <u>स.सदस्यांचे प्रस्ताव</u>

**<u>विषय क्र. ५५७ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.६४ मधील न्यु उस्मानपुरा येथील संत एकनाथ रंग मंदीर ते गुरूतेग बहादुर हायस्कुल पर्यंत जाणाऱ्या रस्त्याला (संत एकनाथ रंग मंदीर समोरचा रोड) लोककला संशोधक श्री.अशोकजी परांजपे मार्ग असे नामकरण करण्यात यावे. या भागातील

नागरीकांचे मागणीनुसार न्यु उस्मानपुरा येथील संत एकनाथ रंग मंदीर ते गुरूतेग बहादुर हायस्कुल पर्यंत जाणाऱ्या रस्त्याला (संत एकनाथ रंग मंदीर समोरचा रोड) लोककला संशोधक श्री. अशोकजी परांजपे मार्ग असे नामकरण करणे संबंधीचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.रेणुकादास (राजु) वैद्य अनुमोदक : श्री.विनायक पांडे

**संवाद :**

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :नामातंराचे प्रस्ताव आलेले आहे एकाच रस्त्याला १०-१० नाव दिले गेले ते तपासून घ्यावे त्यानंतर कार्यवाही व्हावी.

श्री.रेणुकादास वैद्य ज्या रस्त्याला नाव देण्याचा प्रस्ताव मंजूर झाला त्या नावाचा बोर्ड त्या रस्त्यावर लावण्यात यावा.

मा.महापौर यापूर्वी नाव देण्याचे प्रस्ताव झाले प्रस्ताव रिपीट होवू नये याची काळजी घेतली पाहिजे. नाव देण्याचा प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर त्या ठिकाणी बोर्ड लावण्याची जबाबदारी प्रशासनाने घ्यावी.

श्री.अ.रशिद खान :राजाबाजार रस्त्याला नाव देण्याचे ४ वेळेस आले.यामध्ये एका रस्त्याला दुसरे नाव देण्याचा प्रस्ताव आला तसेच एक दवाखाना नाव देण्याचा आले यापूर्वी त्या दवाखान्यास नाव दिले आहे.

मा.महापौर :कोणत्या रस्त्याला काय नाव दिले यांची यादी तयार करून सादर करावी. जे नाव देण्याचे प्रस्ताव मंजूर झाले त्या नावाचा बोर्ड तेथे लावण्यात यावा. हा विषय मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.६४ मधील न्यु उस्मानपुरा येथील संत एकनाथ रंग मंदीर ते गुरूतेग बहादुर हायस्कुल पर्यंत जाणाऱ्या रस्त्याला (संत एकनाथ रंग मंदीर समोरचा रोड) लोककला संशोधक श्री.अशोकजी परांजपे मार्ग असे नामकरण करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.२३ मसनतपुर येथील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करण्यासाठी अर्थसंकल्प २००८-०९ मध्ये तरतुद करण्यात आली असून, सदरील काम मंजुर झाले आहे. तथापी डांबरीकरण ऐवजी या भागात सिमेंट कॉंक्रीटींग रोड तयार करण्यास मंजुरी देण्यात यावी. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव मा.सर्वसाधारण सभेत सादर.

सुचक : श्रीमती मिराताई रामराव शिंदे अनुमोदक : श्री.भाऊसाहेब वाघ

मा.महापौर : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.२३ मसनतपुर येथील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करण्यासाठी अर्थसंकल्प २००८-०९ मध्ये करण्यांत आलेली तरतुद या ऐवजी या भागात सिमेंट कॉंक्रीटींग रोड तयार करण्यासाठी वळती करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, एन-१२ हडको वार्ड क्र.१५ येथे बहुउद्देशीय सभागृह बांधणेचे काम प्रगतीपथावर असुन सदरील कामाअंतर्गत वाढीव कामासाठी रक्कम रू.१० लक्षची तरतुद सन २००९-२०१० अंतर्गत विकास इमारती व शाळा दवाखाने या लेखाशिर्षका अंतर्गत ठेवण्यात आलेली आहे. त्यानुसार सदरील कामाचे एकुण अंदाजपत्रक रक्कम रू.१९.९९+१०.०० = २९.९९ लक्षचे अंदाजपत्रक मान्यतेस्तव व वाढीव काम मुळ मंजुर दरानुसार व मुळ गुत्तेदार मार्फतच करून घेण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री.मोहन धन्नुलाल मेघावाले अनुमोदक : श्री.प्रल्हाद निमगावकर

**संवाद :**

श्री.अ.रशिद खान :काम करण्यास विरोध नाही १० टक्केवर रक्कम जात आहे नियमाने करता येते का नावासहीत प्रस्ताव दिला तसेच सुचक ही हजर नाही.

श्री.गजानन बारवाल :अनेक दिवसापासून हे काम बंद आहे करणे आवश्यक आहे मंजूरी दयावी.

मा.महापौर :मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, एन-१२ हडको वार्ड क्र.१५ येथे बहुउद्देशीय सभागृह बांधणेचे काम प्रगतीपथावर असुन सदरील कामाअंतर्गत वाढीव कामासाठी रक्कम रू.१० लक्षची तरतुद सन २००९-२०१० अंतर्गत विकास इमारती व शाळा दवाखाने या लेखाशिर्षका अंतर्गत ठेवण्यात आलेली असल्यामूळे,त्यानुसार सदरील कामाचे एकुण अंदाजपत्रक रक्कम रू.१९.९९+१०.०० = २९.९९ लक्षचे अंदाजपत्रक मान्यतेस्तव व वाढीव काम मुळ मंजुर दरानुसार, मुळ गुत्तेदार मार्फतच करून घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, उल्कानगरी येथे १९७६ पासून अग्निहोत्र हाऊस प्रस्थापित आहे. गेल्या ३३ वर्षापासून कार्यरत असणाऱ्या अग्निहोत्र हाऊसची जगभर ख्याती आहे.अग्निहोत्र हाऊस शिवपुरी अक्कलकोटनिवासी पदमसदगुरू श्री.गजानन महाराज श्रीजीनी प्रस्थापित केले आहे.

उल्कानगरी येथे डॉ.अष्टपुत्रे यांच्या दवाखान्यासमोरील चौकात अग्निहोत्र हाऊस आहे. या चौकास अग्निहोत्र हाऊस चौक असे नाव देण्यात यावे असा सर्व भाविकांचा आग्रह आहे. यासाठी चौकात खाली दाखवल्याप्रमाणे चबुतरा बांधुन त्यावर अग्निपात्र करण्याची परवानगी असावी यासाठी लागणारा खर्च अग्निहोत्र आचरणकर्ते करणार आहेत. हा खर्च महापालिका अगर कोणत्याही पदाधिकाऱ्यास मागितला जाणार नाही.

तरी सदर चौकास अग्निहोत्र हाऊस चौक नांव देण्यास्तव व यासाठी सदरील चौकात स्मारक बांधण्याची परवानगी देणेस्तव प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : डॉ.आशा बिनवडे, श्री.सुरेंद्र कुलकर्णी अनुमोदक : श्रीमती जयश्री किवळेकर

मा.महापौर : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, उल्कानगरी येथील डॉ.अष्टपुत्रे यांच्या दवाखान्यासमोरील चौकास अग्निहोत्र हाऊस चौक नांव देणेस व यासाठी चौकात चबुतरा बांधुन त्यावर अग्निपात्र करण्याची परवानगी देणेस मान्यता देण्यांत येते. तसेच यासाठी चौकात चबुतरा बांधून त्यावर अग्निपात्र करण्यासाठी येणारा खर्च अग्निहोत्र आचरणकर्ते यांनी त्यांच्या खर्चाने करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, पत्रकार संघटनेच्या मागणी नुसार वार्ड क्र.११ येथील महानगरपालिका शाळेत केलेल्या नवीन बांधकामास जेष्ठ उर्दु पत्रकार स्व.रफीक शहेबाज नाव देऊन वाचनालय सुरू करण्यात यावे. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.संजय उत्तमराव जगताप

अनुमोदक : सौ.विजया बनकर, श्री.जेम्स अंबीलढगे, श्री.गजानन बारवाल

मा.महापौर : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.११ येथील महानगरपालिका शाळेत केलेल्या नवीन बांधकामास जेष्ठ उर्दु पत्रकार स्व.रफीक शहेबाज नाव देऊन वाचनालय सुरू करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.३८ गांधीनगर येथे विविध गल्ल्यांमध्ये डांबरीकरण करणे आवश्यक आहे. त्यासाठी महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पातील वार्ड क्र.३८ मधील खालील निर्देशीत कामाचा लेखाशिर्ष बदलून उपरोक्त कामासाठी सदरील रक्कम वळती करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| १ | वार्ड क्र.३८ गांधीनगर अंतर्गत विविध ठिकाणी नाला दुरूस्ती करणे. डब्ल्यु-१५३ अ.क्र.०८ | ०४ लाख |
| २ | वार्ड क्र.३८ गांधीनगर येथे रामदेवजी बाबा समाजमंदिराची संरक्षक भिंत बांधणे.डब्ल्यु-१४० अ.क्र.१० | ०३ लाख |
| ३ | वार्ड क्र.३८ गांधीनगर अंतर्गत विविध ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणे.डब्ल्यु १४५ अ.क्र.२० | ०५ लाख |
| ४ | वार्ड क्र.३८ अंतर्गत विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन देखभाल. डब्ल्यु-१५१ अ.क्र.१८ | ४.५० लाख |

उपरोक्त प्रमाणे रू.१६.५० लाख ही रक्कम वार्ड क्र.३८ गांधीनगर येथे विविध गल्ल्यांमध्ये डांबरीकरण करणे या कामासाठी वळती करण्यात यावी. करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री.संजु सुग्रीव रिडलॉन　　अनुमोदक : श्री.के.व्ही.मोरे, श्री.महेश माळवतकर

मा.महापौर　　: विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.३८ गांधीनगरसाठी महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात खालीलप्रमाणे असलेली तरतुद.

| | | |
|---|---|---|
| १ | वार्ड क्र.३८ गांधीनगर अंतर्गत विविध ठिकाणी नाला दुरूस्ती करणे. डब्ल्यु-१५३ अ.क्र.०८ | ०४ लाख |
| २ | वार्ड क्र.३८ गांधीनगर येथे रामदेवजी बाबा समाजमंदिराची संरक्षक भिंत बांधणे.डब्ल्यु-१४० अ.क्र.१० | ०३ लाख |
| ३ | वार्ड क्र.३८ गांधीनगर अंतर्गत विविध ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणे.डब्ल्यु १४५ अ.क्र.२० | ०५ लाख |
| ४ | वार्ड क्र.३८ अंतर्गत विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन देखभाल. डब्ल्यु-१५१ अ.क्र.१८ | ४.५० लाख |

र.रू.१६.५० लाख ही रक्कम वार्ड क्र.३८ गांधीनगर येथे विविध गल्ल्यांमध्ये डांबरीकरण करणे या कामासाठी वळती करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभागातील रमानगर येथे मंगल कार्यालय व संरक्षित भिंत दोन्ही कामाचे एकूण २४.०० लक्ष रूपये मंजूर होवून निविदा प्रक्रीया पण पूर्ण झाली होती. सदरच्या जागेवर म.न.पा.व जमिन मालकाचा व तेथील काही नागरीकांचा वाद निर्माण झाला आहे. त्यामूळे एक वर्षापर्यंत वाट बघुन व मटेरियलचे भाव वाढल्यामूळे गुत्तेदारांने काम करण्यास नकार दिला. त्यामूळे खालील कामाचे लेखाशिर्ष बदलून त्याऐवजी दूसरे काम करण्यांत यावे.

| पान क्र. | अ.क्र. | कामाचे नांव | लेखाशिर्ष |
|---|---|---|---|
| W-५१ | १४ | वॉर्ड क्र.६५ अंतर्गत रमानगर येथे मंगल कार्यालय बांधणे तरतूद र.रू.२०.०० लक्ष | व्यापारी संकुल व इतर इमारती |
| W-११६ | १३ | वॉर्ड क्र.६५ रमानगर समोरील मंजूर रेखाकंनातील खुल्या जागेत संरक्षक भिंत बांधणे. तरतूद ४.०० लक्ष | म.न.पा.इमारत देखभाल व दुरूस्ती |

**ऐवजी**

वॉर्ड क्र.६५ अंतर्गत सिंधी कॉलनी,कुशलनगर,रामानंद कॉलनी,बँक कॉलनी,चेतनानगर,रणजितनगर, साराप्राईड या ठिकाणी रस्त्याचे वॉल टु वॉल पुर्न:डांबरीकरण करणे.

सुचक : श्री.मधुकर सावंत

अनुमोदक :श्री.भाऊसाहेब ताठे,श्री.महेश माळवतकर,श्री.काशिनाथ कोकाटे,श्रीमती जयश्री किवळेकर

**संवाद :**

श्री.रेणुकादास वैद्य　　:रमानगर भागात महाालिकेच्या मालकीच्या तीन इमारती आहेत. सध्या रिकाम्या आहे. कर्मचारी निवासस्थान किंवा वार्ड कार्यालय वगैरे काय करता येईल याची प्रशासनाने पाहणी करून कार्यवाही करावी.

मा.महापौर :या इमारतीची देखभाल दुरूस्तीची काळजी घ्यावी तसेच वार्ड कार्यालय ड च्या इमारतीचे देखभाल दुरूस्तीचे काम करावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.६५ करीता अर्थसंकल्पात असलेल्या तरतूदीचे खालीलप्रमाणे लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| पान क्र. | अ.क्र. | कामाचे नांव | लेखाशिर्ष |
|---|---|---|---|
| W-५१ | १४ | वॉर्ड क्र.६५ अंतर्गत रमानगर येथे मंगल कार्यालय बांधणे तरतूद र.रू.२०.०० लक्ष | व्यापारी संकुल व इतर इमारती |
| W-११६ | १३ | वॉर्ड क्र.६५ रमानगर समोरील मंजूर रेखाकंनातील खुल्या जागेत संरक्षक भिंत बांधणे. तरतूद ४.०० लक्ष | म.न.पा.इमारत देखभाल व दुरूस्ती |

**ऐवजी**

वॉर्ड क्र.६५ अंतर्गत सिंधी कॉलनी,कुशलनगर,रामानंद कॉलनी,बँक कॉलनी,चेतनानगर,रणजितनगर, साराप्राईड या ठिकाणी रस्त्याचे वॉल टु वॉल पुर्नःडांबरीकरण करणे. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६४ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्रातर्फे गतवर्षी अभिवादन ग्रंथ प्रकाशित करण्यात आला. परंतू ग्रंथाची किमंत रू.२००/- असल्याने ग्रंथ विक्रीस कमी प्रतिसाद मिळतो. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचार सामान्य जनतेपर्यंत पोहचविण्याचा हेतू साध्य होण्यासाठी ग्रंथाची किमंत रू.२००/- ऐवजी रू.१००/- ठेवण्यांत यावी. प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री.गजानन रामकिसन बारवाल,श्री.संजय उत्तमराव जगताप

अनुमोदक : श्री.नारायण तिलोकचंद कुचे, श्री.मिलींद दाभाडे

**संवाद :**

श्री.रेणुकादास वैद्य : अभिवादन ग्रंथ प्रकाशित केला असे यात म्हटले असे केले असेल तो ग्रंथ चांगला असेल त्याबध्दल अभिनंदन परंतु सभागृहातील किती सदस्यांना हा ग्रंथ प्रकाशित झाला आहे यात नेमके काय आहे याची किमंत २००/-रू वरून १००/-रू का करतो आहोत. याची माहिती घेण्यात यावी.

प्रकल्प संचालक :गेल्या वर्षी महापालिकेच्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्राच्या वतीने आपण डॉ.बाबासाहेब आंबेडकर अभिवांदन ग्रंथ दैनिक सकाळ नाशिकचे संपादक मा.उत्तम कांबळे यांचे हस्ते मोठया थाटात प्रकाशन झाले होते एकूण १५०० प्रति छपाई केलेल्या होत्या त्यापैकी २०० प्रतिच विकल्या गेल्या याचें प्रत्येकी मुल्य हे १९५/-रू मध्ये छपाई करून घेतलेले आहे.याचे मुल्य २०० रू. ठेवले असल्याने लोकांना कदाचित हे जास्त वाटत असावेत १४ एप्रिल तसेच ६ डिसेंबर या दिवशी अनेक ठिकाणी प्रदर्शने आयोजित केली परंतु या पुस्तकाची विक्री जास्त प्रमाणात झाली नाही.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :शहरात अनेक मोठमोठया शाळा महाविदयालय आहेत त्यांना प्रत्येक एक पुस्तक महापालिकेच्या वतीने सप्रेम भेट दयावे एवढया किमंतीमध्ये कुणीही घेणार नाही हे निश्चित आहे.

श्री.गजानन बारवाल :चांगले पूस्तक आहे श्री.जावरे यांचे अभिनंदन. स.सदस्यांनी केलेल्या सुचनांचा विचार करावा. किंमत कमी करणे योग्य वाटते.स.सदस्य श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर यांनी सुचना केली त्याचाही विचार व्हावा १०० रू दर मंजूर करण्यात यावे.

श्री.भगवान घडमोडे :स.सदस्य श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर यांनी जी सुचना मांडली त्याप्रमाणे त्या त्या शाळेला महाविदयालयास एक-एक प्रति देण्यात याव्यात. निवडक वाचनालयातही देण्यात यावे त्याची यादी करावी.

मा.महापौर :अतिशय चांगला प्रस्ताव आहे मंजूर करण्यात येतो.महापालिकेच्या वतीने हा अभिवादन ग्रंथ तयार केला मान्यवराचे फार चांगले लेख यात आहे उत्तम छपाई आहे सकाळचे संपादक श्री.उत्तमजी कांबळे यांचे हस्ते याचा मोठा कार्यक्रम घेतला होता या ग्रंथाचे लोकार्पण झाले होते. आताच खुलासा केल्याप्रमाणे २००रू.किंमत जास्त होते तर १००रू करण्यास हरकत नाही. आताच स.सदस्यांनी सुचना केल्या प्रमाणे या शहरातील काही शाळा व महाविदयालया मध्ये हा ग्रंथ असणे आवश्यक आहे. अशा निवडक शाळांची महाविदयालयाची यादी तसेच वाचनालयाची यादी करून महापालिकेच्या माध्यमातून हा ग्रंथ देण्यात यावा.एरवी या अभिवादन ग्रंथाची किमंत १०० रू. असावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्रातर्फे गतवर्षी प्रकाशित करण्यात आलेला अभिवादन ग्रंथाची किमंत रू.२००/- ऐवजी रू.१००/- ठेवण्यांस मान्यता देण्यांत येते. तसेच निवडक शाळांची महाविदयालयाची तसेच वाचनालयाची यादी करून महापालिकेच्या माध्यमातून हा ग्रंथ देण्यात यावा. यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६५ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वॉर्ड क्र.७८ मधील अहिल्याबाई होळकर चौक ते सुतारवाड्या पर्यंत रस्त्यावर पेव्हर ब्लॉक बसविणेचे काम चालू आहे. त्यासाठी अर्थसंकल्पातील तरतूद कमी पडत असल्याने खालीलप्रमाणे तरतूद वळती करून मिळणेस विनंती आहे. करीता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

| वळती करावयाची रक्कम/कामाचे नांव | नविन कामाचे नांव |
|---|---|
| वॉर्ड क्र.७८ चिकलठाणा येथे स्ट्रॉम वॉटर गटार बांधणे. तरतूद रू.५.५० लाख.<br>पान क्र.W-१५९ अ.क्र.२ वळतीची र.रू.२.५० लक्ष | वॉर्ड क्र.७८ मधील अहिल्याबाई होळकर चौक ते सुतारवाड्या पर्यंत रस्त्यावर पेव्हर ब्लॉक बसविणेसाठी -रू.२.५० लक्ष वळती करणे आहे. |

तरी वरील प्रमाणे तरतूद वळती करून मिळावी ही विनंती.

सुचक : श्री.रवि साहेबरावजी कावडे अनुमोदक : श्री.भगवान घडमोडे

मा.महापौर : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.७८ करीता अर्थसंकल्पात असलेल्या तरतूदीचे खालीलप्रमाणे लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

| वळती करावयाची रक्कम/कामाचे नांव | नविन कामाचे नांव |
|---|---|
| वॉर्ड क्र.७८ चिकलठाणा येथे स्ट्रॉम वॉटर गटार बांधणे. तरतूद रू.५.५० लाख.<br>पान क्र.W-१५९ अ.क्र.२ वळतीची र.रू.२.५० लक्ष | वॉर्ड क्र.७८ मधील अहिल्याबाई होळकर चौक ते सुतारवाड्या पर्यंत रस्त्यावर पेव्हर ब्लॉक बसविणेसाठी -रू.२.५० लक्ष वळती करणे आहे. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६६ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, दिनांक २४.०७.२००९ रोजी पांढरे वाघाची मादी राणी पिंजऱ्याची भिंत कोसळण्याच्या दुर्घटनेमूळे पिंजऱ्याच्या बाहेर पडली व हत्तीगृहाच्या समोर असलेल्या झाडीत शिरली. हि वाघीण कंपाऊंडवॉलच्या बाहेर नागरी वस्तीत शिरली असती तर मोठा अनर्थ घडु शकला असता. परंतू प्राणी संग्रहालयातील कर्मचारी, वनविभाग, अग्निशमन विभागाचे कर्मचारी यांनी प्रयत्नांची शिकस्त करून व जीव धोक्यात घालून वाघीणीला वेळीच पकडून जेरबंद करण्यात यश मिळविले व पूढील दुर्घटना टळली.

या प्रसंगी खालील अधिकारी/कर्मचारी यांनी प्राण धोक्यात घालून आपले कर्तव्य बजावले.

अ) प्राणी संग्रहालयात घटनास्थळी तातडीने उपस्थित होवून कार्यवाहीसाठी मार्गदर्शन करणारे वरिष्ठ अधिकारी

१. श्री.उध्दव घुगे - मा.उपआयुक्त (महसूल)
२. श्री.बी.बी.म्हस्के - मा.शहर अभियंता
३. श्री.एम.बी.तांबडे - उपआयुक्त (पोलीस)

ब) प्रत्यक्ष कार्यवाहीत सहभागी झालेले अधिकारी

१. डॉ.बी.एस.नाईकवाडे - प्राणी संग्रहालय संचालक
२. श्री.जी.एम.शिंदे - वनक्षेत्रपाल वनविभाग
३. श्री.शिवाजी झनझन - मुख्य अग्निशमन अधिकारी
४. श्री.मेघराजानी - पोलीस निरीक्षक पोलीस विभाग
५. श्री.दिलीप यार्दी - मानद वन्यजीव संरक्षक,औरंगाबाद
६. श्री.जे.एम.भडके - उद्यान अधिक्षक

क) प्रत्यक्ष कार्यवाहीत सहभागी झालेले कर्मचारी

१. श्री.नंदन महादु - पशुधन पर्यवेक्षक
२. श्री.अब्दुल खलील - माळी
३. श्री.शेख शाहेद - पशुधन पर्यवेक्षक
४. श्री.सुकदेव शेळके - प्राणी संग्रहालय
५. श्री.शेख जहीर - प्राणी संग्रहालय
६. श्री.चंद्रकांत काळे - प्राणी संग्रहालय
७. श्री.सोमनाथ मोटे - प्राणी संग्रहालय
८. श्री.अब्दुल खमर - प्राणी संग्रहालय (वाहनचालक)
९. श्री.नित्यानंद साळवे - प्राणी संग्रहालय
१०. श्री.विनायक पोमा राठोड - वाहन चालक
११. श्री.असदउल्ला खान - स्वच्छता निरीक्षक व महाराणा सेक्युरिटी सर्व्हीसेसचे सुरक्षा रक्षक,अग्निशमन विभागाचे उपस्थित कर्मचारी,वन विभागाचे उपस्थित कर्मचारी, पोलीस विभागाचे उपस्थित कर्मचारी, मनपा प्राणी संग्रहालयाचे कर्मचारी.

करीता राणी वाघीण बाहेर पडल्यामूळे उद्‌भवलेल्या आपत्कालीन परिस्थितीत वाघीणीस पकडण्याच्या कार्यवाहीतील सहभागी उपरोक्त नमूद अधिकारी / कर्मचारी यांचे महानगरपालिकेतर्फे अभिनंदन करणे बाबतचा ठराव सर्वानुमते मा.सर्वसाधारण सभेत मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री.गजानन रामकिसन बारवाल,श्री.रेणुकादास वैद्य

अनुमोदक : श्री.विजय खुडे,श्री.संतोष खेंडके पाटील,श्री.संतोष जेजुरकर,सौ.कला बोरामणीकर, सौ.छाया राऊत

**<u>संवाद :</u>**

श्री.अ.रशिद खान : मंजूर करण्यांस हरकत नाही. ज्यांनी मदत केली त्यांचे अभिनंदन करायलाच पाहीजे. शहराचे सी.डी.पी. गुप्ता साहेब आयुक्त असतांना आपल्या काळात सचिव विभागातर्फे करण्यात आले, आपणासही धन्यवाद. काहींची ड्युटी होती, त्यांनी काम केले. परंतू ज्यांची ड्युटी नसतांना देखिल त्यांनी काम केले, त्यांना व यात वर्ग-३,४ कर्मचारी यांनी चांगले काम केले, त्यांना एक वेतनवाढ द्यावी.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : ज्यांनी ज्यांनी मदत केली, त्या सर्वांचे अभिनंदन करावे, परंतू वर्ग-३ व वर्ग-४ मध्ये जे कर्मचारी तेथे नियमित चांगले काम करतात त्यांना आर्थिक मदत देता येत असेल तर ती द्यावी. सर्वांचेच अभिनंदन.

श्री.प्रशांत देसरडा : या विषयाच्या अनुषंगाने या वार्डाचे स.सदस्य श्री.अ.रशिद खान मामु यांचेही अभिनंदन करण्यांत येते.विचार केला तर खरच त्यादिवशी एक अनर्थ टळला सदर वाघीण ही शहरात किंवा पाठीमागील भागात पळाली नाही. येथे बरेचशे कर्मचारी अनेक वर्षानुवर्षापासून दैनिक वेतनावर कार्यरत आहे. अनेक कर्मचारी दैनिक वेतनावर निवृत्त झाले. यात संजय महादु नंदन हे पशुधन पर्यवेक्षक म्हणून १९९६ पासून दैनिक वेतनावर कार्यरत आहे ते कार्यरत असलेले पद रिक्त आहे. या पदाची जाहीरात निघाली होती पूढे कार्यवाही झालेली दिसत नाही. या कर्मचाऱ्यांचे चांगले काम आहे, वाटल्यास अहवाल मागवून घ्यावा.हे एकटेच कर्मचारी नव्हे तर असे जे काही कर्मचारी दैनिक वेतनावर आहे व ते पद सध्या अस्थापनेवर रिक्त आहे, अशा कर्मचाऱ्यांना महापालिका सेवेत कायम करावे या सर्व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करावे व जे दैनिक वेतनावर कर्मचारी कार्यरत आहे ते काम करीत असलेले पद रिक्त आहे, अशा कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी सेवेत घेण्यात यावे.

श्री.मुजीब खान : हे सत्य आहे की, जर वाघीण बाहेर निघुन गेली असती तर अनुचित घटना घडली असती. त्यामूळे,ज्या कर्मचाऱ्यांनी पकडण्यासाठी मदत केली त्यांचे अभिनंदन करायलाच पाहीजे. जे वर्ग ४ चे कर्मचारी आहे, त्यांना एक वेतनवाढ द्यावी यामूळे चांगले काम केल्याने त्या कर्मचाऱ्यांची महापालिका कदर करते हे इतर कर्मचाऱ्यांना कळेल.

श्री.गजानन बारवाल : प्रस्ताव मी ठेवला सुचक म्हणून माझे नांव आहे, यात स.सदस्य श्री.अ.रशिद खान मामु यांचेही सुचक म्हणून नांव नमूद करावे. ज्या दिवशी वाघीण सुटली त्यावेळेस मी प्रत्यक्ष दर्शनी त्या ठिकाणी होतो. अनेकांनी जनतेपासून ते मिडीयापर्यंत असे सर्वांनीच विशेष सहकार्य केले हे सांगावेसे वाटते. त्यामूळे त्यांचेही मनपूर्वक अभिनंदन परंतू पोलीस उपायुक्त श्री.तांबडे साहेब यांनी त्या ठिकाणी विशेष असे लक्ष दिले तसेच श्री.मेघराजन, श्री.दिलीप यार्दी तसेच श्री.जी.एम.शिंदे जे फॉरेस्ट अधिकारी आहे, त्यांनी तेथे मोठे धाडसी कार्य केले या सर्वांचे अभिनंदन. पत्रकारांनी यात मोठे सहकार्य केले, त्यांचे अभिनंदन करण्यात यावे. स.स.श्री.मुजीब खान व श्री.अ.रशिद खान मामु, श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर यांनी सूचना केल्याप्रमाणे वेतनवाढ मान्य करावे.

श्री.अ.रशिद खान : औरंगाबाद शहराचे २५ वर्षाचे नकाशा,सी.डी.पी.सचिव,त्यांचे कर्मचारी यांनी केले, त्यांनाही वेतनवाढी देण्यात यावे.

मा.महापौर : या विषयात सुचक म्हणून माजी महापौर श्री.अ.रशिद खान मामु यांचे सुध्दा नांव ॲड करण्यात येते. हा विषय मंजूर करण्यात येतो. यामध्ये अनेक लोकांनी वाघीणीला पकडण्याकरीता मदत केली आहे. या सगळ्यांचे अभिनंदन करण्यात येते. यात काम करणारे अनेक मंडळी अशी होती की, ते महापालिकेशी संबंधीत नव्हती. यात पोलीस अधिकारी,वन क्षेत्रपाल, मानद संरक्षक असतील असे अनेक मंडळी यात होती त्यांनी मोठे योगदान दिलेले आहे या सर्वांचे अभिनंदन करण्यांत येते अशा अधिकाऱ्यांना महापालिका प्रशासनाने पत्र पाठवून त्यांचे धन्यवाद व्यक्त करावे. तसेच यात महापालिकेचे कर्मचारी त्यात वर्ग ४ च्या कर्मचाऱ्यांनी अत्यंत धडाडीने काम केले आहे. आताच काही सदस्यांनी व्यथा मांडली की, अनेक कर्मचारी दैनिक वेतनावर काम करतात, ते काम करीत असलेले पद रिक्त आहे. श्री.नंदन महादु यांचे एक उदाहरण होते असे आणखी कर्मचारी असतील,

जी पदे रिक्त आहे व त्या पदावर जे कर्मचारी काम करतात अशा कर्मचाऱ्यांना त्या पदावर महापालिकेच्या सेवेत सामावून घ्यावे. जे कर्मचारी यात होते, स.सदस्यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे एक वेतनवाढ देण्यात यावी. जे कर्मचारी अस्थायी आहे, त्यांनी यात काम केले, त्यांनाही बक्षीस स्वरूपात काही तरी देण्याची तरतूद करावी.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : शहराचा विकास आराखडा सी.डी.पी. जो २५ वर्षापर्यंतचा नकाशा केलेला आहे, अशा अधिकाऱ्यांचा/कर्मचाऱ्यांचाही विचार करावा, त्यांना वेतनवाढी देण्यात यावी, जे जे कूणी असतील, त्या सर्वांना देण्यात यावे.

मा.महापौर : या शहराच्या जडणघडणीमध्ये ज्याचा मोठा सहभाग राहीला होता, सचिव व त्यांचे कर्मचारी यांनी सी.डी.पी. केले, त्यांना वेतनवाढी देण्यात यावे तसेच प्रशासनास जे करता येईल, त्याप्रकारचे कौतूक ही करावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार दिनांक २४.०७.२००९ रोजी पांढरे वाघाची मादी राणी पिंजऱ्याची भिंत कोसळण्याच्या दुर्घटनेमूळे पिंजऱ्याच्या बाहेर पडली व हत्तीगृहाच्या समोर असलेल्या झाडीत शिरली. हि वाघीण कंपाऊंडवॉलच्या बाहेर नागरी वस्तीत शिरली असती तर मोठा अनर्थ घडु शकला असता. परंतू प्राणी संग्रहालयातील कर्मचारी, वनविभाग, अग्निशमन विभागाचे कर्मचारी यांनी प्रयत्नांची शिकस्त करून व जीव धोक्यात घालून वाघीणीला वेळीच पकडून जेरबंद करण्यात यश मिळविले व पूढील दुर्घटना टळली. त्याबद्दल प्रस्तुत प्रस्तावातील अ.क्र. अ) १ ते ३, ब) १ ते ६, व क) १ ते ११ मधील अधिकारी/कर्मचारी व यात जे महापालिकेशी संबंधीत नव्हते अशाही अधिकारी/कर्मचारी या सर्वांचे अभिनंदन करण्यांत येते अशा अधिकाऱ्यांना महापालिका प्रशासनाने पत्र पाठवून त्यांचे धन्यवाद व्यक्त करावे. तसेच यात महापालिकेचे कर्मचारी त्यात वर्ग ३ व वर्ग ४ च्या कर्मचाऱ्यांनी अत्यंत धडाडीने काम केले आहे. असे अनेक कर्मचारी दैनिक वेतनावर काम करतात, ते काम करीत असलेले पद रिक्त आहे,श्री.नंदन संजय महादु,पशुधन पर्यवेक्षक यांचे एक उदाहरण होते त्यांना कायमस्वरूपी सेवेत घेण्याची कार्यवाही करावी. असे आणखी कर्मचारी असतील, जी पदे रिक्त आहे व त्या पदावर जे कर्मचारी काम करतात अशा कर्मचाऱ्यांना त्या पदावर महापालिकेच्या सेवेत सामावून घ्यावे. जे कर्मचारी यात होते, स.सदस्यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे एक वेतनवाढ देण्यात यावी. जे कर्मचारी अस्थायी आहे, त्यांनी यात काम केले, त्यांनाही बक्षीस स्वरूपात काही तरी देण्याची तरतूद करावी. तसेच या शहराच्या जडणघडणीमध्ये ज्याचा मोठा सहभाग राहीला होता, नगर सचिव व त्यांचे संबंधीत लिपीक यांनी सी.डी.पी. केले, त्यांनाही वेतनवाढी देण्यास तसेच प्रशासनाने जे करता येईल त्या प्रकारचे कौतूकही करावे, यास मान्यता देण्यांत येते. तसेच या विषयात सुचक म्हणून माजी महापौर श्री.अ.रशिद खान मामु यांचे सुध्दा नांव ॲड करण्यात येते. या दुरूस्तीसह सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६७ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद शहरात महापालिकेमार्फत बांधण्यात आलेले भारत माता मंदिर आहे. संपूर्ण भारतात भारत मातेची तीनच मंदिरे आहेत. भारत माता मंदिर हे जाज्वल्य देशप्रेमाचे प्रतीक आहे. करिता वीर सावरकर चौक (रोपळेकर हॉस्पिटल) ते जवाहर कॉलनी रोड या रस्त्याचे भारत माता मंदिर मार्ग असे नामकरण करण्यात यावे. तसेच सेव्हन हील व अमरप्रित चौक येथे असलेल्या दिशादर्शक फलकावर भरत माता मंदिर मार्गाकडे असे दर्शविणारा मजकुर दर्शविण्यात यावा. करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री.संजय जोशी

अनुमोदक :डॉ.आशा बिनवडे, सौ.अंजली कोंडेकर,सौ.रेखा काथार,श्री.सुरेंद्र कुलकर्णी,श्री.रविंद्र गांगे

मा.महापौर : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वीर सावरकर चौक (रोपळेकर हॉस्पिटल) ते जवाहर कॉलनी रोड या रस्त्याचे भारत माता मंदिर मार्ग असे नामकरण करण्यास तसेच सेव्हन हील व अमरप्रित चौक येथे असलेल्या दिशादर्शक फलकावर भरत माता मंदिर मार्गाकडे असे दर्शविणारा मजकुर दर्शविण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६८ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मराठवाडा साहीत्य परिषदेतर्फे मराठवाड्यातील स्त्रियांच्या कलागुणांना वाव मिळावा या हेतूने मराठवाड्यातील स्त्री लेखिकांसाठी मराठवाडा लेखिका साहित्य संमेलन आयोजीत करण्यांत येणार आहे.

सदरील साहित्य संमेलनासाठी औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे रू.तीन लाखाची आर्थिक मदत करण्यांत यावी. करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजूरीस्तव सादर.

सुचक : डॉ.आशा बिनवडे अनुमोदक : श्रीमती मिराताई रामराव शिंदे

**संवाद :**

श्रीमती रजनी जोशी : प्रस्ताव चांगला आहे महिलाच्या कला गुणांना वाव मिळतो महानगरपालिकेच्या वतीने घेण्यात यावे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : जेथे आर्थीक मदत दिली जाते तेथे महापालिकेचा सहभाग असायला पाहिजे.महापालिकेचे फायनन्स प्राव्हेटाचे मार्केटींग होते हे यापूढे बंद व्हावे.महापालिकेतर्फे करण्यात यावे.

मा.महापौर : कार्यक्रम मराठवाडा साहित्य परिषदेच्या वतीने होणार आहे. मी महिला महापौर असल्यामूळे, यासाठी मदत करावी, अशी महिला स.सदस्यांची आग्रहाची विनंती होती. आताच म्हटले की, एवढी मदत करण्याची महापालिकेची परिस्थिती नाही. ज्या ठिकाणी महापालिका मदत करते तेथे महापालिकेचे नांव असणे गरजेचे आहे. हे सम्मेलन महिलासाठीचे असल्यामूळे, आपल्या परीने काहीतरी मदत केली पाहीजे म्हणून यासाठी १.०० लक्ष रू.ची आर्थिक मदत करण्यास मान्यता देण्यांत येते. यात औरंगाबाद महापालिकेचे नांव असावे हे काटाक्षाने बघितले जावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार मराठवाडा साहीत्य परिषदेतर्फे मराठवाड्यातील स्त्रियांच्या कलागुणांना वाव मिळावा या हेतूने मराठवाड्यातील स्त्री लेखिकांसाठी आयोजीत साहित्य संमेलनासाठी औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे र.रू.१.०० लक्ष अर्थसाह्य करण्यास आणि या संमेलनाच्या सहभागात औरंगाबाद महानगरपालिकेचे नांव असावे, यासह सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६९ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, सर्वसाधारण सभा दिनांक १२.०२.२००९ प्रस्ताव क्र.३९८ अन्वये स्थायी समिती ठराव क्र.१४१ दिनांक ४.१२.२००८ अन्वये मंजूर केलेला औरंगाबाद शहरातील महत्वाचे चौकात नागरीक वाहतुक नियमाबाबत जनजागृती करणेसाठी इंडिया ॲड चंद्रपुर यांच्या वतीने ४ चौ.फुट आकाराचे २५० साईन बोर्ड लावण्यासाठी श्री.एस.महेमुद पिता एस.जलाल यांना तीन वर्षासाठी परवानगी देण्याबाबतच्या प्रस्ताव सर्वसाधारण सभेत ठेवण्यांत आला असता, त्यास मंजूरी प्राप्त झाली नाही. त्यामूळे सदर प्रस्ताव पून्हा सादर करण्यांत येत आहे की,

औरंगाबाद शहरातील महत्वाचे चौकात नागरीक वाहतुक नियमा बाबत जनजागृती करणेसाठी इंडिया ॲड चंद्रपुर यांच्या वतीने ४ चौ. फुट या आकाराचे २५० साईन बोर्ड लावण्याबाबत श्री.एस.महेमुद पिता एस.जलाल यांनी तीन वर्षाकरीता परवानगीची मागणी केलेली

आहे. त्यासाठी संबंधीतांनी पोलीस कार्यालयाचे ना हरकत बाबतचे पत्र सादर केलेले असून पोलीस निरीक्षक, वाहतुक शाखा,औरंगाबाद शहर यांनी सुध्दा संमती दर्शविलेली आहे.

तरी परवानगी देय झाल्यास ४ चौ.फुट प्रमाणे २५० साईन बोर्डच्या नगास जाहीरात कराच्या रक्कमेपोटी १,८०,०००/- ची भर मनपा फंडात पडणार असल्याने यास मा.सर्वसाधारण सभेने मान्यता दिल्यास संबंधीताकडून एक वर्षाचे आगाऊ भरणा करून करारनामा करून घेणे योग्य होईल. या संदर्भात पोलीस विभागाकडून वारंवार पत्र व्यवहार होत असून सदर प्रस्ताव मंजूर करणे बाबत विनंती करण्यांत आलेली आहे. करीता प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

सुचक : श्री.अ.साजेद अ.सत्तार अनुमोदक : श्री.सतिष कटकटे

**संवाद :**

श्री.रेणुकादास वैद्य :हा विषय जाहिरात याशी निगडीत आहे महापालिकेला कशासाठी १.८० लक्ष देणार आहे असे प्रस्ताव प्रशासनाकडून आले तर जास्त योग्य होईल. खुलासा व्हावा.

श्री.काशिनाथ कोकाटे : महापालिकेच्या उत्पन्नाचा भाग आहे आताच म्हटल्या प्रमाणे ही लहान सेल ॲड आहे बजेट बुक अंतिम झाले नाही कामे होत नाही ५-२-२ मध्ये कोणती व कशा पध्दतीने कामे होतात मार्ग नाही. ५-२-२ म्हणजे काय या संदर्भात मा.न्यायालयात प्रकरणे आहेत त्या संदर्भात खुलासा घ्यावा.

श्री.रेणुकादास वैद्य : अशासकीय प्रस्ताव आहे १.८० लाख कोणी ठरवले. रद्द करावे. प्रशासनातर्फे ठेवावे.

श्री.गजानन बारवाल : विषय रद्द करावा.

मा.महापौर : विषय क्र.५६९ नामंजूर.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव नामंजूर करण्यांत आला.

**विषय क्र. ५७० :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्रभाग क्र.८७ उल्कानगरी येथील खालील मार्गांना नांवे देणे करीता प्रस्ताव सादर करण्यांत येत आहे.

०१. परीमल एस.टी.डी. ते राजाज कॉर्नर या मार्गाला कै.दत्ताजी भाले मार्ग असे नांव देण्यांत यावे.

०२. व्यंकटेश मंगल कार्यालय ते उद्योगसृष्टी या मार्गाला पदमश्री श्री.शंकरबापु आपेगांवकर हे नांव देण्यांत यावे.

०३. ओंकारेश्वर चौक ते कासलीवाल अंगण प्रांगण या उल्कानगरीतील मुख्य रस्त्याला श्री.गोळवलकर गुरूजी मार्ग असे नांव देण्यांत यावे.

सुचक : सौ.अंजली दिलीप कोंडेकर अनुमोदक : डॉ.भागवत कराड

मा.महापौर : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.८७ उल्कानगरी येथील खालील मार्गांना नांवे देण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

०१. परीमल एस.टी.डी. ते राजाज कॉर्नर या मार्गाला कै.दत्ताजी भाले मार्ग असे नांव देणे.

०२. व्यंकटेश मंगल कार्यालय ते उद्योगसृष्टी या मार्गाला पदमश्री श्री.शंकरबापु आपेगांवकर हे नांव देणे.

०३. ओंकारेश्वर चौक ते कासलीवाल अंगण प्रांगण या उल्कानगरीतील मुख्य रस्त्याला श्री.गोळवलकर गुरूजी मार्ग असे नांव देणे. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५७१ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, अर्थसंकल्प २००९-१० पान क्र.इइसी ४७ अनुक्रमांक २ पडेगांव दलित मुस्लीम स्मशान भूमी संरक्षित भिंत बांधणे-३.५० लाख याचे लेखाशिर्ष बदलून खालील कामासाठी सदरील रक्कम वळती करण्यांत यावी.

०१. वॉर्ड क्र.८ मध्ये विविध ठिकाणी विद्युत खांब व दिवे बसविणे (३.५० लाख)

उपरोक्त प्रमाणे ३.५० लाख रूपये विद्युतसाठी वळती करण्यांत यावे. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेमध्ये मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री.तरविंद्रसिंग धिल्लन अनुमोदक : श्री.संजय जगताप

मा.महापौर : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अर्थसंकल्प २००९-१० पान क्र.इइसी ४७ अनुक्रमांक २ पडेगांव दलित मुस्लीम स्मशान भूमी संरक्षित भिंत बांधणे-३.५० लाख याचे लेखाशिर्ष बदलून खालील कामासाठी सदरील रक्कम वळती करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

०१. वॉर्ड क्र.८ मध्ये विविध ठिकाणी विद्युत खांब व दिवे बसविणे (३.५० लाख)

वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबर राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

**नगर सचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद